नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २४२ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

उद्या अंक नाही

शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ "स्वातंत्र्य दिनानिमित्त" दै. गांवकरी कार्यालयाला सुट्टी असल्याने रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.

- संपादक

थोडक्यात...

रायगड जिल्ह्यात वीजचोरांना महावितरणचा 'शॉक'

अलिबाग (स. गांवकरी) : वीजबिल न भरता अनधिकृतपणे वीज वापरणाऱ्यांविरोधात महावितरणने आता कारवाईचा धडाका सुरू केला आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत आणि खालापूर तालुक्यात राबवण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेत तब्बल ३१ ग्राहकांकडून सुमारे ५२ हजार युनिटची वीजचोरी उघडकीस आली आहे. या वीजचोरीची किंमत तब्बल १५ लाख रुपयांच्या आसपास असल्याने महावितरणच्या कारवाईने परिसरातील वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत. भांडुप परिमंडलाच्या वतीने वीजचोरीला आळा घालण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर चक्रे फिरली!

चाकणच्या तब्बल ११ वर्षांपासून रखडलेल्या प्रस्तावाला गती

पुणे : (स. गांवकरी)

चाकण परिसराचा सर्वांगीण विकास करण्याची चक्रे अखेर फिरू लागली आहेत. चाकण औद्योगिक नगरी स्थापन करण्याचा प्रस्ताव ११ वर्षे राज्य सरकारकडे प्रलंबित होता. त्याला आता गती मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश दिल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) तातडीने या संदर्भात पावले उचलली आहेत. या बाबत 'एमआयडीसी'ने विविध शासकीय यंत्रणांची संयुक्त बैठक घेतली. त्यात चाकण औद्योगिक नगरी विकसित करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक बाबींवर चर्चा करण्यात आली.

चाकणमधील खराब रस्ते आणि पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था उद्योजकांच्या स्थलांतराच्या इशाऱ्यानंतर समोर आली. याची गंभीर दखल घेऊन सरकारने तातडीने पावले उचलण्यास सुरुवात केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील औद्योगिक क्षेत्रांचे रूपांतर औद्योगिक नगरीत करण्याची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर 'एमआयडीसी'चे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त बैठक झाली. बैठकीला पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ आणि जिल्हा परिषदेचे अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत चाकण औद्योगिक नगरी विकसित करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. त्या दृष्टीने कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. याचबरोबर चाकण आणि तळेगाव परिसरात सध्या सुरू असलेले आणि भविष्यात होणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबत चर्चा करण्यात आली. या प्रकल्पांसाठी सविस्तर नियोजनासह चाकण आणि तळेगावमधील नागरी विकासाला गती देण्यावर भर देण्यात आला. या दोन्ही औद्योगिक क्षेत्रातील सर्वांगीण विकासासाठी शाश्वत औद्योगिक परिसंस्था निर्माण करण्यासाठी पावले उचलण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

चाकण परिसराचा एकात्मिक सर्वंकष आराखडा तयार केला जाणार आहे. या बाबत जिल्हाधिकारी कार्यालयात विविध यंत्रणांची शुक्रवारी बैठक झाली. या बैठकीत प्रामुख्याने पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्यासोबत चाकण औद्योगिक परिसराचा भविष्यातील विस्तार डोळ्यासमोर ठेवून नगर नियोजन करण्याबाबत चर्चा करण्यात आली. चाकण औद्योगिक क्षेत्राच्या सर्वांगीण विकासावर या आराखड्यात भर देण्यात येणार आहे, अशी माहिती 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी यांनी दिली.

अन्यथा उद्योग स्थलांतरित होतील

चाकण औद्योगिक परिसराच्या कोंडीमागे प्रामुख्याने शासकीय यंत्रणांतील समन्वयाचा अभाव कारणीभूत आहे. या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी त्याचे औद्योगिक नगरीत रूपांतर करण्याचे पाऊल स्वागतार्ह आहे. मात्र, हे दीर्घकालीन नियोजन करताना उद्योगांना सध्या भेडसावणाऱ्या समस्यांकडे सरकारने दुर्लक्ष करू नये. अन्यथा उद्योग येथून स्थलांतरित होतील. या परिसरातील पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देऊन ते लवकरात लवकर पूर्ण करावेत, अशी भूमिका फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप बटवाल यांनी मांडली.

प्राधान्यक्रमाची कामे

खड्डे बुजविण्यासह रस्त्यांची दुरुस्ती
रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविणे
रस्त्यांवर वाहने उभी करण्यास मनाई
वाहनतळ विकसित करणे
पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या कामांना गती

- चाकण, तळेगावमधील रस्त्यांचे जाळे
- महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ – ५३.२० किलोमीटर
- सार्वजनिक बांधकाम विभाग – ६३.२० किलोमीटर
- भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण – २९.९२ किलोमीटर
- महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ – ४१ किलोमीटर
- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण – ४०.७४ किलोमीटर
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ – ११४.०६ किलोमीटर

पुण्यातील झेन झीच्या अड्ड्याला एफडीए चा झटका

बर्गर किंग वर कारवाई ; परवाना निलंबित

पुणे : (स. गांवकरी)

बर्गरच्या चवीपेक्षा आता स्वच्छतेचा 'निकष' महत्त्वाचा ठरणार आहे! पुण्यातील कॅम्प मधील ईस्ट स्ट्रीटवरील बर्गर किंगवर अन्न व औषध प्रशासन पुणे विभागाने कारवाई केली. गेल्या अनेक वर्षांपासून कॅम्प मधील बर्गर किंग हा तरुणाईचा अड्डा समजला जातो. ईस्ट स्ट्रीटवरील बर्गर किंग हे मोक्याच्या ठिकाणी असलेले साखळी रेस्टॉरंट आहे. यामध्ये अस्वच्छता, अन्नाचा दर्जा याविषयी अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार नोंदवण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी बर्गर किंग रेस्टॉरंट मध्ये जाऊन पाहणी केली. यामध्ये काही त्रुटी आढळल्यामुळे त्यांनी कारवाईचा बडगा उगारला.

बर्गर किंग सह पुणे विभागातील हॉटेल-रेस्टॉरंट, ई-कॉमर्स आणि डेअरी आस्थापनांच्या तपासणीत गंभीर अनियमितता आढळल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने तब्बल १६ आस्थापनांचे परवाने अथवा नोंदणी तात्काळ निलंबित केली आहे. 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत ११ ते १४ ऑगस्टदरम्यान ही धडक कारवाई करण्यात आली.


या विशेष मोहिमेत हॉटेल, रेस्टॉरंट, ई-कॉमर्स आणि डेअरी आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणात अस्वच्छता तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदींचे पालन न केल्याचे आढळले. त्यामुळे संबंधित आस्थापनांवर परवाना अथवा नोंदणी निलंबित करण्याची कारवाई करण्यात आली.

- 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत पुणे विभागातील १६ आस्थापनांचे परवाने निलंबित



पुण्यातील ईस्ट स्ट्रीट, सोलापूर बाजार कॅम्प येथील बर्गर किंगचा या कारवाईत समावेश आहे. त्याचबरोबर लोणावळ्यातील हॉटेल सयाजीअंतर्गत फॉर्च्युन एंटरप्रायझेस, लोहेगावमधील हॉटेल चुल मटण, भोसरीतील सिम्पली साऊथ, कोल्हापुरातील हॉटेल पवन आणि सांगलीतील राजेश चायनीज या हॉटेल-रेस्टॉरंटवरही कारवाई करण्यात आली. पुण्यातील जेबीएम हॉस्पिटॅलिटीच्या कॅन्टीनला परवाना नसल्याने व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.





आमदारांकडून पत्रकाराला धमकी?

अर्वाच्च वक्तव्याचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाकडून जाहीर निषेध!

जुन्नर : (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्यातील अजनावळे येथील आश्रमशाळेत अदानी प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांची बैठक सुरू असताना आमदार शरद सोनवणे यांनी पत्रकार सुरेश वाणी यांच्याशी कथितरीत्या अर्वाच्च भाषेत वक्तव्य करून धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे पत्रकारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने या घटनेचा तीव्र शब्दांत जाहीर निषेध केला आहे. बैठकीदरम्यान पत्रकार सुरेश वाणी यांना उद्देशून, "१५ ऑगस्ट होऊ द्या... माझ्यावर याआधी भरपूर गुन्हे आहेत. वाणी, तुमच्याकडे बघून घेतो," अशा आशयाचे वक्तव्य केल्याचा आरोप आहे. तसेच "पत्रकारांचे धंदे झाले आहेत" अशा प्रकारचे वक्तव्य करून पत्रकारांचा अवमान केल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून, जनतेचे प्रश्न प्रशासन आणि लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचविणे, वस्तुस्थिती मांडणे आणि प्रश्न विचारणे हे त्याचे घटनात्मक लोकशाहीतील महत्त्वाचे कार्य आहे. त्यामुळे पत्रकारांना धमकावणे किंवा त्यांचा अवमान करणे हा प्रकार कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नसल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी या घटनेचा निषेध करताना सांगितले की, आमदारांना एखाद्या पत्रकाराबद्दल वैयक्तिक राग किंवा नाराजी असेल, तर तो जाहीरपणे व्यक्त करण्याऐवजी पत्रकाराची बाजू आणि वस्तुस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. पत्रकारांना दमदाटी करणे म्हणजे लोकशाहीचा घात करण्यासारखे आहे. न्यायव्यवस्थेतील व्यक्तींवर अन्याय झाल्यास त्या देखील पत्रकारांकडे आपली बाजू मांडतात आणि न्यायाची अपेक्षा करतात. महाराष्ट्र ही शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारी भूमी असून, किल्ले शिवनेरीचे आमदार शरद सोनवणे यांच्या कथित बेछूट वक्तव्याचा राज्य पत्रकार संघाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, आमदार शरद सोनवणे यांनी पत्रकार बांधवांची जाहीर माफी मागून आपले वक्तव्य मागे घेतले नाही, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनीता पवार यांना निवेदन देऊन राज्यभर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आला आहे. पत्रकारांच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही आणि पत्रकारांच्या सन्मान व सुरक्षिततेसाठी संपूर्ण पत्रकार संघटना ठामपणे उभी राहील, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे.

तामसा ग्रामपंचायतीच्या स्वच्छता अभियानाची पोलखोल!

तामसा : (स. गांवकरी)



स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर तामसा येथे तिरंगा रॅली उत्साहात निघाली. हातात तिरंगा घेऊन विद्यार्थी, नागरिक आणि विविध संघटनांचे पदाधिकारी रॅलीत सहभागी झाले होते. मात्र, याच रॅलीच्या मार्गावर रस्त्याच्या कडेला साचलेले कचऱ्याचे ढीग आणि पसरलेली अस्वच्छता प्रकर्षाने दिसून आली. त्यामुळे एकीकडे देशभक्तीचा जागर सुरू असताना दुसरीकडे तामसा ग्रामपंचायतीच्या स्वच्छता अभियानाचीच पोलखोल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. रॅलीदरम्यान रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, कागद, घरगुती कचरा व इतर घाण साचलेली दिसत होती. या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांची आणि नागरिकांची तिरंगा रॅली याच मार्गावरून जात असताना हा कचरा प्रशासनाच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरला. तामसा ग्रामपंचायतीकडून स्वच्छता अभियान, स्वच्छ तामसा आणि कचरामुक्त परिसर याबाबत विविध उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्ष रस्त्याच्या कडेला साचलेले कचऱ्याचे ढीग पाहता स्वच्छता अभियान केवळ कागदावरच आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

भोकर येथे जेलभरो आंदोलन

भोकर : (स. गांवकरी)

शेतकरी, शेतमजूर, ऊसतोड मजूर, कामगार व कर्मचारी यांच्या विविध मागण्यांसाठी किसान सभा, शेतमजूर युनियन आणि सिटूच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १०) भोकर तहसील कार्यालयासमोर जेलभरो आंदोलन व तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलकांच्या शिष्टमंडळाने नायब तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात ९ ऑगस्ट १९४२ रोजी झालेल्या 'भारत छोडो' आंदोलनाच्या प्रेरणेने देशातील कामगार, शेतकरी, शेतमजूर व कर्मचारी आपल्या विविध प्रश्नांसाठी लोकशाही मार्गाने संघर्ष करीत आहेत, असे यावेळी आंदोलकांनी सांगितले. वाढती महागाई, बेरोजगारी, शेतीचे वाढते संकट, ग्रामीण रोजगारातील घट, कामगार कायदे कमजोर करण्याचे प्रयत्न तसेच धनिकधार्जिण्या धोरणांमुळे ग्रामीण भागातील गरीब व कष्टकरी जनतेचे जीवन अधिक असुरक्षित झाले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. शेतकरी व जनविरोधी प्रस्तावित भारत-अमेरिका व्यापार करार रद्द करावा, चार श्रमसंहितांची अंमलबजावणी थांबवावी, नियमित कर्जदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे तसेच पीक विम्याची घोषित रक्कम तातडीने शेतकऱ्यांना अदा करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.







असंख्य हितचिंतक, सभासद ग्राहकांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!







भदरचा कायापालट! झंपाताई-रमेश थोरात म्हणजे विकासाची जोडी!

- डोंगरातही विकास शक्य आहे! भदरची क्रांतीगाथा
- महिला सरपंच झंपाताई थोरात आणि खंबीर साथीदार रमेश थोरात यांनी 5 वर्षात बदलले गावाचे नशीब

अनिल पवार कनाशी
कळवण : (स. गांवकरी)









शब्दांकन : अनिल पवार, कनाशी, कळवण संपर्क: 8530674192

सुरगाणा तालुक्याच्या कुशीत वसलेली, डोंगर-दऱ्यांनी वेढलेली आणि आदिवासीबहुल भदर ग्रुप ग्रामपंचायत आज जिल्ह्यासाठी एक आदर्श बनली आहे. वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेल्या या गावाला नवी ओळख मिळवून दिली ती आहे सरपंच झंपाताई रमेश थोरात यांच्या कर्तव्यदक्ष आणि पारदर्शक कारभाराने.

महिला सरपंच म्हणजे फक्त शिक्का मारणारे पद, हा समज झंपाताईंनी मोडीत काढला. त्यांनी सिद्ध केले की इच्छाशक्ती असेल तर दुर्गम भागाचाही कायापालट होऊ शकतो. **पाण्याची 30 वर्षांची व्यथा**

संपली : भदरची सर्वात मोठी समस्या होती पाणी. उन्हाळ्यात टँकरसाठी रांगा लागायच्या. झंपाताईंनी याला खिंडार पाडले. जलजीवन मिशनचा पाठपुरावा करून 95% घरांमध्ये नळ कनेक्शन पूर्ण केले. उर्वरित कामासाठी निधी मंजूर झाला आहे. साठवण तलावाची दुरुस्ती करून पाणी टंचाई कायमची दूर केली. आता आमच्या मुलींना माथ्यावर हंडा घेऊन मैलो चालावे लागत नाही, हे ग्रामस्थांचे वाक्य त्यांच्या कामाची पोचपावती आहे.

रस्ते, लाईट, स्वच्छता - तिहेरी विकास : दळणवळणासाठी भदर ते मुख्य रस्त्याचे डांबरीकरण मंजूर करून घेतले. अंतर्गत पाड्यांवर मुरमीकरण आणि पेव्हर ब्लॉकची कामे केली. रात्रीच्या सुरक्षिततेसाठी सौर पथदिवे बसवले. स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्रत्येक घरात शौचालय आणि घनकचरा व्यवस्थापन सुरू केल्याने भदरला तालुक्यात स्वच्छ ग्राम म्हणून मान मिळाला.

झंपाताईंचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्या फक्त फाईलवर स्वाक्षरी करणाऱ्या सरपंच नाहीत. त्या स्वतः पाड्यापाड्यावर जातात. कोणाच्या घरी आजारपण, मुलीचे लग्न किंवा शासकीय दाखल्याचे काम असेल तर त्या स्वतः पुढाकार घेतात. महिलांसाठी बचतगट सशक्त केले. बांबूच्या वस्तू आणि वारली पेंटिंगला तालुक्यात शिबिर भरवून बाजारपेठ मिळवून दिली. शाळेची पटसंख्या वाढवण्यासाठी पालक मेळावे आणि मुलींसाठी मोफत सायकलचा प्रस्ताव पाठवला. विकासाला पक्ष नसतो या भूमिकेमुळे विरोधकही त्यांच्या कामाचे कौतुक करतात.

खंबीर पाठीराखा : नगरसेवक रमेश थोरात : झंपाताईंच्या या यशामागे एक खंबीर आधार आहे - त्यांचे पती नगरसेवक व भाजपा तालुका अध्यक्ष रमेश थोरात. सुरगाणा तालुक्यातील एक खंबीर नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे.

सरपंच निधीतून होऊ न शकणारी कामे करण्यासाठी रमेश थोरात यांनी सुरगाणापासून थेट मंत्रालयापर्यंत पाठपुरावा केला. अनेक योजना आणि निधी त्यांनी स्वतः जाऊन मंजूर करून आणले. गरज पडली तर दिल्लीला जाऊन वरिष्ठ नेत्यांची भेट घेऊन भदर आणि परिसराच्या प्रश्नांवर चर्चा करतात. गावात काय पाहिजे हे झंपाताई ठरवतात आणि ते मिळवून देण्याची जबाबदारी मी घेतो - ही त्यांची जोडीच भदरच्या विकासाचे गमक आहे. पती-पत्नीच्या या विकासदूत जोडीने ग्रामीण भागात विकासाची नवी दिशा दिली आहे.

पुढील 10 वर्षांचा धडाकेबाज रोडमॅप : झंपाताई थांबल्या नाहीत. त्यांनी पुढील काळासाठी 5 मुद्द्यांचा आराखडा तयार केला आहे. झंपाताई रमेश थोरात यांनी दाखवून दिले की नेतृत्व म्हणजे खुर्ची नाही, तर जबाबदारी आहे. त्यांचा प्रामाणिकपणा, मेहनत आणि समाजाप्रती असलेली तळमळ हीच त्यांची खरी ओळख आहे. आणि त्यांना लाभलेली रमेश थोरात यांची साथ ही भदरच्या नशिबाला कलाटणी देणारी ठरली आहे. भदरचा हा विकासाचा वारा संपूर्ण सुरगाणा तालुक्यासाठी आणि राज्यातील महिला सरपंचांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचा संकल्प पूर्ण होवो आणि भदर आदर्श ग्राम म्हणून राज्यात नाव कमवो, हीच सदिच्छा.









मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

आळेफाटा, ता. जुन्नर : (स. गांवकरी)



१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून प्राथमिक आरोग्य केंद्र, निमगाव सावा येथे शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सुमारे ११५ नागरिकांनी या आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. शिबिरामध्ये नागरिकांची BMI (शरीर वस्तुमान निर्देशांक), BMR (ऊर्जा चयापचय दर), उंची, वजन, कंबरभोवतीची चरबी, शरीरातील एकूण चरबीचे प्रमाण, अवयवांभोवतीची चरबी (Visceral Fat), स्नायूंचे वजन (Muscle Mass) तसेच चयापचय वय (Metabolic Age) आदींची तपासणी करण्यात आली.

नागरिकांनी आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करून संभाव्य आरोग्य समस्या वेळीच ओळखणे आवश्यक आहे. या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या शिबिरामुळे नागरिकांना आपल्या शरीरातील विविध आरोग्यविषयक घटकांची माहिती मिळण्यास मदत झाली. या आरोग्य शिबिराचे आयोजन श्री. अजित नानाभाऊ गाडगे, अध्यक्ष भाजपा युवा मोर्चा,व मित्रा परिवाराकडुन अयोजित करण्यात आले होते याप्रसंगी आरोग्य सल्लागार म्हणुन सो पुजा कुदळे, स्नेहल भन्साळी, जगदीश महाजन याचे तापसाणीसाठी मार्गदर्शन लाभले या कार्यक्रमाला ह भ प बबन महाराज डुकरे,किरण गोत्राळ, वैभव गाडगे केतन गाडगे प्रदिप चौधरी, रामदास गाडगे, अशोक गहिने, भिवसेन डुकरे याची प्रमुख मान्यवर म्हणुन उपस्थिती होती जुन्नर तालुका व भारतीय जनता पार्टी निमगाव सावा यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी नागरिकांनी, शिबिरातील रुग्णांनी आयोजकाबद्दल समाधान व्यक्त केले.

जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांची अत्यंत दयनीय अवस्था

अक्कलकोट : (स. गांवकरी)

- सुलेरजवळगे शाळेच्या धोकादायक खोल्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची ग्रामस्थांची मागणी

अक्कलकोट तालुक्यांतील जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून जुन्या मोडकळीस आलेल्या इमारती जीर्ण झालेल्या खोल्या आणि त्यावरील खराब झालेले पत्रे अशी गंभीर आणि तितकीच दयनीय अवस्था असलेल्या वर्ग खोल्या हे सर्व बघून जिल्हा परिषद शाळा मधील मुलांचे जीव सुरक्षित आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. अक्कलकोट तालुक्यांतील बबलद येथील जिल्हा परिषद कन्नड शाळेच्या इमारतीचा स्लॅब पडून मोठी दुर्घटना घडली आणि या दुर्घटनेत जवळपास १५ विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. बबलाद येथील शाळेच्या अपघात घटने नंतर अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा सुरक्षित आहेत का याबाबत पाहणी केली असता जवळपास ८० टक्के शाळा नादुरुस्त आणि इमारती जीर्ण झालेल्या व पत्रे गळके असलेल्या भिंती पडलेल्या खिडक्या नसलेल्या दरवाजे तुटलेले छप्पर नीट नसलेल्या शाळा आढळून आल्या वागदरी येथील शाळा तर कधी पडेल हे सांगता येत नाही. सुलेरजवळगे शाळेच्या धोकादायक खोल्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांची केली आहे अशीच परिस्थिती तालुक्यातील अनेक गावातील जिल्हा परिषद शाळांची आहे.

डॉ संकेतसारख्या युवा नेतृत्वाचा अभिमान वाटतो' : माजी आमदार गोविंदराव केंद्रे

नाशिक : (स. गांवकरी)



वंजारी समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांचा गौरव करण्यासाठी डॉ. संकेत सुमन तुकाराम सानप यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेला 'वंजारी समाज रत्न पुरस्कार सोहळा २०२६' रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी नाशिक येथे मोठ्या उत्साहात, दिमाखदार आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याच्या माध्यमातून समाजातील गुणवंतांचा सन्मान करण्याबरोबरच युवा नेतृत्व, समाजएकजूट आणि शैक्षणिक प्रोत्साहनाचा संदेश देण्यात आला. या भव्य सोहळ्यास माजी आमदार गोविंदराव केंद्रे, डॉ. तुळशीराम महाराज गुट्टे, नगरसेविका दिपाली गिते, गणेश गिते, विवेक महाराज केदार, गुजरातचे प्रसिद्ध उद्योगपती मोहनराव घुगे, वंजारी सेवा संघाचे अध्यक्ष राहुल जाधवर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माजी आमदार गोविंदराव केंद्रे यांनी डॉ. संकेत सानप यांच्या सामाजिक उपक्रमांचे विशेष कौतुक केले. "संकेतसारख्या युवा तरुणाने एवढ्या मोठ्या प्रमाणात समाजाला एकत्र आणण्याचे काम केले, याचा अभिमान वाटतो," असे गौरवोद्गार त्यांनी काढले. युवा पिढीने समाजाच्या विकासासाठी पुढाकार घेऊन सकारात्मक कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. या सोहळ्यात एमपीएससीच्या माध्यमातून अधिकारी पदावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.













हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २४१ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026



थोडक्यात...



सुखबीर सिंग बादल यांच्यावर हल्ला

पुणे (स. गांवकरी) : पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री तथा शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीर सिंग बादल यांच्यावर आज (१३ ऑगस्ट) नांदेडमधील गुरुद्वारामध्ये जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत सुखबीर सिंग बादल यांच्या हाताला आणि खांद्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या घटनेतील हल्लेखोर जसपाल सिंगला अटक करण्यात आली आहे. हल्लेखोर जसपाल सिंग हा मूळचा पुण्यातील असल्याची माहिती सांगितली जात आहे. मात्र, हल्लेखोर जसपाल सिंगने सुखबीर सिंग बादल यांच्यावर अचानक हल्ला केला का केला? हल्ला करण्यामागचा हेतू काय होता? याचा तपास पोलीस करत आहेत. या संपूर्ण घटनेच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. तसेच पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेनंतर सुखबीर सिंग बादल यांच्या तब्येतीबाबत विचारपूस केली आहे.

भूसंपादनात सहखातेधारकांचा हिस्साही निश्चित

पुणे (स. गांवकरी) : 'सार्वजनिक विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादित करताना सहधारकांमध्ये नुकसानभरपाईच्या वाटपावरून होणारे वाद आणि न्यायालयीन प्रकरणांमुळे भूसंपादनाला होणारा विलंब टाळण्याच्या दृष्टीने भूसंपादन प्रकरणातील संयुक्त मोजणीच्या वेळी सर्व सहधारकांचे जमिनीतील प्रत्यक्ष ताब्यानुसार आणि हिश्शानुसार विशेष क्षेत्र निश्चित केले जाणार आहे,' अशी माहिती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी दिली. दरम्यान, संयुक्त मोजणी अहवालातच प्रत्येक सहधारकांचे क्षेत्र स्पष्टपणे नमूद करण्यासंदर्भातील नवी मानक कार्यपद्धती महसूल विभागाकडूनही तातडीने जाहीर करण्यात आली आहे. यामुळे भूसंपादनासाठी जागा देणाऱ्या शेतकऱ्यांसह नागरिकांचे आपापसातील वाद मिटणार असून, संबंधित जागेतील हिस्साधारकांना समान हिस्सा मिळणार आहे.

५ वर्षांत ३६ हजार कंपन्या बंद!

पुणे (स. गांवकरी) : गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रातील तब्बल ३६ हजार २११ खासगी कंपन्या बंद झाल्याची माहिती केंद्र सरकारने संसदेत दिली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात खासगी कंपन्या बंद झाल्याने जेष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी चिंता व्यक्त केली आहे. तसेच वाहतूक कोंडीला कंटाळून चाकणमधील जवळपास २० कंपन्यांनी स्थलांतरित होण्याचा निर्णय घेतला आहे. यावरही शरद पवार यांनी भाष्य करत सरकारकडे चार मोठ्या मागण्या केल्या आहेत. चाकण औद्योगिक वसाहतीतील २० कंपन्यांनी वाहतूक कोंडी, प्रदूषण, पाणी, वीज आणि रस्त्यांच्या समस्यांमुळे स्थलांतर करण्याचा निर्णय घेतल्याची ही बाब अत्यंत गंभीर आहे. याचा रोजगारावर मोठा परिणाम होण्याची भीती शरद पवार यांनी व्यक्त केली आहे. तसेच राज्य सरकारने यावर तातडीने योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शरद पवार यांनी केली. या संदर्भात त्यांनी सोशल मीडियावर सविस्तर पोस्ट शेअर केली आहे.

आमदार अपात्र ठरल्यास ठाकरेंचे बहुमत!

कपिल सिबल यांचा युक्तिवाद; केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह



नवी दिल्ली : (स. गांवकरी)

निवडणूक आयोगाच्या आकडेवारी नुसार, ठाकरे गटाकडे एकूण ३४ आमदार व खासदार, तर शिंदे गटाकडे ५३ आमदार व खासदार होते. मात्र, शिंदे गटातील ३९ आमदार अपात्र ठरले असते, तर विधिमंडळातील बहुमतही ठाकरे गटाकडेच आले असते, असा दावा सिबल यांनी केला. त्यामुळे आयोगाला कोणता निर्णय घ्यायचा होता, त्यांना कुठे पोहोचायचे आहे हे आधीच माहीत होते आणि त्यानुसार आयोगाने स्वत:साठी एक मार्ग तयार केला, असा गंभीर आरोप ठाकरे गटाचे वकील कपिल सिबल यांनी केला.

शिवसेनेचे निवडणूक चिन्ह व आमदार अपात्रतेसंदर्भातील सुनावणी सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची व न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी झाली. यावेळी सिबल यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर शंका उपस्थित केली. पक्ष व निवडणूक चिन्ह शिंदे गटाला बहाल करताना आयोगाने अधिकार कक्षेबाहेर जाऊन निर्णय घेतल्याने निर्णयाचा फेरविचार करावा लागेल, असा युक्तिवाद सिबल यांनी केला.

आमदारांना अपात्र ठरवण्याचा अधिकार विधानसभाध्यक्षांना आहे. पक्ष व चिन्हासंदर्भातील निर्णय घेण्याचे अधिकार केंद्रीय निवडणूक आयोगाला. निवडणूक झाल्यामुळे अपात्रतेचा मुद्दा निरर्थक ठरतो पण, राजकीय पक्षासंदर्भातील मुद्दा कायम राहतो, त्याचा विचार करावाच लागेल, अशी टिप्पणी न्या. बागची यांनी केली. यासंदर्भात सिबल यांनी राजकीय पक्षातील बहुमत हे विधिमंडळातील बहुमतापेक्षा श्रेष्ठ ठरते असे सांगत आयोगाने फक्त विधिमंडळातील बहुमताचा विचार केला, असा आक्षेप नोंदवला.

बहुजन समाज पक्षाच्या प्रकरणाचा दाखला देताना सिबल म्हणाले की, अपात्रता कारवाई सुरू झाल्यानंतर हळूहळू आमदार एखाद्या गटात दाखल झाले म्हणून नंतरच्या संख्येच्या आधारे सुरुवातीच्या फुटीला वैधता देता येणार नाही. आमदारांची संख्या 'स्नोबॉलिंग' करून एक-तृतीयांश बहुमत तयार करता येणार नाही. दहाव्या अनुसूचीचा उद्देश पक्षांतराला रोखण्याचा आहे, त्याला वैधता देणे नाही, असे सिबल म्हणाले. सिबल यांनी आयोगाच्या आदेशातील विविध विसंगती निदर्शनास आणून दिल्या. त्याद्वारे आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय कधी घ्यायचा याबाबत विधानसभाध्यक्षांवर कालमर्यादा घालता येऊ शकत नाही, या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाच्या निकालाचा फेरविचार करण्याची गरज आहे व हे प्रकरण सात न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे पाठवले पाहिजे, अशी विनंती सिबल यांनी केली.

नोटीस का पाठवली नाही?

पक्षाची २०१८ ची घटना 'लोकशाहीविरोधी' असल्याचा आयोगाच्या निष्कर्षावर सिबल यांनी शंका उपस्थित केली. पक्षाची घटना लोकशाहीविरोधी आहे की नाही, हे ठरवण्याचा अधिकार आयोगाला नाही. पक्षघटना नियमांनुसार आहे की नाही हे आयोगाला तपासता येऊ शकेल व ती तशी नसेल तर पक्षाला नोटीस देता येऊ शकते. पण ते न करताच दुसऱ्या व्यक्तीला पक्षाचे चिन्ह देता येणार नाही, असेही सिबल म्हणाले.

लोकशाहीचे रक्षण सामूहिक जबाबदारी

लोकशाही आणि कायद्याचे राज्य टिकविण्यासाठी यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाला कायद्याचा अर्थ स्पष्ट करण्याची संधी आहे. लोकशाहीचे रक्षण करण्याची जबाबदारी न्यायालयावर आहे, असे सिबल म्हणाले. त्यावर, न्या. बागची यांनी, लोकशाहीचे रक्षण ही सामूहिक जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले.

कोल्हापूर सर्किट बेंचचा आरोग्य विभागाला झटका

सावंतवाडी : (स. गांवकरी)

- सावंतवाडी ट्रामा केअर युनिटप्रकरणी आरोग्य संचालकांना २९ ऑगस्टला हजर राहण्याचे आदेश



सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयातील 'ट्रामा केअर युनिट'च्या दरावस्थेबाबत उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने आरोग्य विभागाला तीव्र शब्दांत फटकारले आहे. या प्रकरणी आरोग्य संचालकांनी स्वतः २९ ऑगस्टच्या सुनावणीस न्यायालयात हजर राहावे, असे थेट आदेश न्यायालयाने दिले आहेत. 'अभिनव फाऊंडेशन, सिंधुदुर्ग' यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर न्यायमूर्ती नीरज धोते आणि न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान अभिनव फाऊंडेशनतर्फे वकील महेश राऊळ यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचा दाखला देत सावंतवाडी रुग्णालयातील गंभीर त्रुटी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. देशातील सर्व राज्यांमध्ये ट्रामा केअर युनिट सक्षम करून रुग्णांचे प्राण वाचवण्याचे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले असतानाही आरोग्य विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

सावंतवाडी ट्रामा केअर युनिटमध्ये २०१३ पासून एकही तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी नाही. येथील सर्वच्या सर्व ५ पदे रिक्त आहेत.उपजिल्हा रुग्णालयात २१ नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदांपैकी केवळ ३ अधिकारीच कार्यरत आहेत. याचिका दाखल झाली तेव्हा ही संख्या ५ होती, ती वाढण्याऐवजी आणखी घटली आहे . उपचारांअभावी या रुग्णालयातून दरमहा सुमारे १६० रुग्णांना गोव्यातील बांबोळी किंवा इतर रुग्णालयांमध्ये संदर्भित (Refer) करावे लागते. सरकारी वकिलांनी कंत्राटी व बंधपत्रित डॉक्टरांद्वारे सेवा दिली जात असल्याचे आणि नवीन भरती प्रक्रिया सुरू असल्याचे न्यायालयात सांगितले. मात्र, कंत्राटी डॉक्टर हे तात्पुरते आणि प्रशिक्षणार्थी असतात, असा आक्षेप याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी घेतला. यापूर्वी जिल्हा शल्यचिकित्सकांनी वारंवार प्रतिज्ञापत्रे दाखल करूनही प्रत्यक्षात कोणतीही सुधारणा झालेली नाही. त्यामुळे आता आरोग्य संचालकांनीच भरतीचे वेळापत्रक आणि ट्रामा केअर युनिटच्या सक्षमीकरणाचा आराखडा घेऊन न्यायालयात हजर राहावे, असे स्पष्ट निर्देश खंडपीठाने दिले.

आधार कार्डचा गैरवापर अन् वृद्धाची १.७४ कोटींची फसवणूक

पुणे : (स. गांवकरी)

- प्रसिद्ध रीलस्टारला अटक; पुण्यात खळबळ

गेल्या काही वर्षांत फसवणुकीच्या घटनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे फसवणुकीचे प्रकारही वाढले आहेत. चुकून एखाद्या गोष्टीवर क्लिक झालं आणि नंतर फसवणूक झाल्याच्या अनेक घटना आतापर्यंत समोर आल्या आहेत. आता अशाच प्रकारच्या फसवणुकीची पण वेगळी घटना उघडकीस आली आहे. आधार कार्डचा गैरवापर करून तब्बल १.७४ कोटींची फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात एका कथित प्रसिद्ध रीलस्टारला पोलिसांनी पुण्यात बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे. डिजिटल अरेस्टच्या नावाखाली एका वृद्ध व्यक्तीची १.७४ कोटी रुपयांच्या फसवणुकीच्या प्रकरणात या कथित रीलस्टारचा सहभाग असल्याचा आरोप आहे. पुणे सायबर पोलिसांनी एका २६ वर्षीय सोशल मीडिया रीलस्टारला अटक केली. डिजिटल अरेस्टच्या नावाखाली एका वृद्ध व्यक्तीची १.७४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. रोहन जाधव असं या संशयिताचं नाव असून पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत. "रोहन हा मूळ छत्रपती संभाजीनगरचा रहिवासी आहे. त्याने एका नागरिकाच्या आधारकार्डचा गैरवापर करून त्यांच्या नावाने एका बँकेत बनावट खातं उघडलं होतं आणि त्या खात्याचा वापर एका गुन्ह्यात करण्यात आल्याची माहिती तपासात समोर आली आहे. तसेच आरोपीने डिजिटल अरेस्टची धमकी देऊन डेक्कन परिसरातील एका ८२ वर्षीय वृद्ध व्यक्तीची १०.७३ कोटींची फसवणूक केल्याचा आरोप आहे", अशी माहिती पोलिसांनी सांगितली आहे.

लवकरच राज्यात महाआधार, एकात्मिक ओळख क्रमांकाद्वारे सेवांचा लाभ

कागदपत्रांच्या दरवेळच्या कटकटीतून सुटका

मुंबई : (स. गांवकरी)

माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञा यांचा प्रभावी वापर करून नागरिकांना जलद आणि पारदर्शकपणे सेवा पुरवण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील प्रत्येक नागरिकाला डिजिटल 'महा-आयडी' ओळख क्रमांक देण्यात येणार असून या क्रमांकाच्या माध्यमातून त्यांना विविध शासकीय सेवांचा सहज लाभ मिळवता येणार आहे. हा कोणताही स्वतंत्र ओळख क्रमांक नसून आधारचा समावेश असलेला 'महाआयडी' असणार आहे.



सर्व प्रकारच्या सरकारी सेवा नागरिकांना बसल्याजागी उपलब्ध व्हाव्यात यासाठी माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञेचा वापर करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व विभागांना दिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राज्यातील नागरिकांना ही एकात्मिक डिजिटल ओळख दिली जाणार आहे. हा ओळख क्रमांक नागरिकांच्या आधारशी थेट संलग्न असेल. त्यामुळे नागरिकांना केवळ महाआयडी क्रमांक देऊन कोणत्याही विभागातून माहिती, योजना, अनुदान किंवा सेवेचा लाभ घेता येणार आहे. अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, शिधापत्रिका तसेच शासनाकडे उपलब्ध इतर नोंदी सरकारकडे अधिक उपलब्ध असल्याने त्यासाठी प्रत्येकवेळी कागदपत्रे द्यावी लागणार नाहीत. येत्या स्वातंत्र्यदिनी मुख्यमंत्री या उपक्रमाबाबत सूतोवाच करण्याची शक्यता आहे. प्रत्यक्ष उपक्रमाची घोषणा लवकरच केली जाणार आहे.

या निर्णयाचा विशेष लाभ विद्यार्थी, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, महिला उद्योजक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना होणार आहे. राज्यात आजमितीस विविध शिष्यवृत्तींसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षण विभागाच्या पोर्टलवर स्वतंत्र नोंदणी करावी लागते. अनुदानासाठी अर्ज करणार्या शेतकर्याला ओळख, जमीन व बँक खात्याची माहिती वारंवार सादर करावी लागते. सामाजिक कल्याण योजनांसाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थीला इतर विभागांकडे आधीपासून उपलब्ध असलेली प्रमाणपत्रे आणि कागदपत्रे पुन्हा द्यावी लागतात. त्याचप्रमाणे विविध सरकारी विभागांशी व्यवहार करताना नागरिकांना वारंवार स्वत:ची ओळख सिद्ध करणे, स्वतंत्र नोंदणी करणे, अनेक युजरनेम आणि पासवर्ड लक्षात ठेवणे आणि तीच कागदपत्रे पुन्हा पुन्हा सादर करावी लागतात. या कटकटीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय घेतला आहे.

शासकीय विभागांत अधिक समन्वय

महाआयडी- महासारथीच्या माध्यमातून विविध सरकारी विभाग आणि शासकीय डिजिटल प्लॅटफॉर्मना महाआयडीशी एकत्रित जोडले जाणार आहे. राज्याच्या डिजिटल प्रशासन व्यवस्थेतील परस्पर कार्यक्षमता अधिक सक्षम होत आहे. सरकार विविध विभागांची माहिती परस्परांशी जोडत असल्याने एखाद्या विभागास दुसर्या विभागाकडील माहिती हवी असल्यात ती आपोआप घेतली जाईल.

दोन वर्षांत आश्रमशाळांतील ५८४ विद्यार्थ्यांचा मृत्यू

पाच टक्के मृत्यूस सर्पदंश कारणीभूत

मुंबई : (स. गांवकरी)

राज्याच्या आदिवासी विभागाच्या अंतर्गत असलेल्या १,०५६ आश्रमशाळांमध्ये मागील दोन वर्षांमध्ये तब्बल ५८४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून अनुदानित आश्रमशाळांपेक्षा सरकारी आश्रशाळांमध्ये अधिक प्रमाणात मृत्यू झालेले आहेत. मृत्यूच्या कारणांपैकी ५ टक्के विद्यार्थ्यांचे मृत्यू केवळ सर्पदंशाने झाले आहेत.

राज्यात शासकीय आश्रमशाळा ५०० असून त्यामध्ये २,०४,१७५ विद्यार्थी शिक्षण घेतात, त्यांच्यावर वार्षिक २,३०३ कोटी खर्च होतो, तर अनुदानित आश्रमशाळा ५५६ असून त्यामध्ये २,६१,८३६ विद्यार्थी शिकतात. त्यांच्यावर प्रतिवर्ष २,०२५ कोटी रुपये खर्च केला जातो. मागच्या आठवड्यात गडचिरोली जिल्ह्यातील जपतलाई येथील आश्रमशाळेत सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला. या घटनेनंतर आदिवासी विभागाकडून आश्रमशाळांचा आढावा घेतला जात आहे. गेल्या दोन वर्षांत ५८४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. शासकीय आश्रमशाळांमध्ये ३८४ विद्यार्थ्यांचे मृत्यू झाले असून ३६ विद्यार्थी शाळांच्या आवारात तर घरी असताना ३४८ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. अनुदानित आश्रमशाळांमधील २०० विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून त्यापैकी ३० विद्यार्थ्यांचा शाळांच्या आवारात तर १७० विद्यार्थ्यांचा घरी असताना मृत्यू झाला.

११ टक्के मृत्यू हे आश्रमशाळांच्या आवारात झाले असून ८८ टक्के मृत्यू हे विद्यार्थी पालकांच्या ताब्यात म्हणजे घरी असताना झालेले आहेत.

बहुतांश अनुदानित आश्रमशाळा या राजकीय नेत्यांच्या आहेत. विद्यार्थ्यांच्या मृत्यूची घटना घडल्यास शाळांची मान्यता रद्दची कारवाई होऊ शकते. मात्र मान्यता रद्द केल्यास शाळा संचालक न्यायालयात जातात, स्थानिक आंदोलने करतात, त्यामुळे शाळांवर कारवाई करणे विभागाला अडचणीची झाले आहे.

आश्रमशाळांमधील विद्यार्थी मृत्यूचा प्रश्न गेली २५ वर्षे कायम आहे. हा विषय केवळ आश्रमशाळांच्या इमारती आणि सोयीसविधांपुरता नसून तो सामाजिक- आर्थिक प्रश्न आहे. त्यामुळे ओडिशा राज्यातील कलिंगा प्रारूपाप्रमाणे आश्रमशाळांचा समूह विकास करण्याचा आदिवासी विभागामध्ये विचार सुरू आहे.

> पावसाळ्यात सर्पदंशाच्या प्रमाणात वाढ होते. त्यासंदर्भातल्या उपाययोजनेच्या सूचना शाळांना दिल्या आहेत. सर्व आश्रमशाळांचे परीक्षण करण्यात येत असून विद्यार्थी सुरक्षेबाबत सुनिश्चित कार्यपद्धती बनवली जात आहे.
> **– विजय वाघमारे, सचिव, आदिवासी विभाग**



मुरुमासाठी अख्खा डोंगरच 'फस्त'

उत्खनन मर्यादेचे उल्लंघन केल्याचा आरोप; सातारा जिल्ह्यातील प्रकार

सातारा : (स. गांवकरी)

जमिनीचे सपाटीकरण करण्यासाठी एका व्यावसायिकाला महसूल प्रशासनाने १ हजार ब्रास मुरूम उत्खननाची मंजुरी दिली. परंतु व्यावसायिकाने या मर्यादेचे उल्लंघन करत संपूर्ण डोंगरच पोखरल्याचा प्रकार सातारा तालुक्यातील सज्जनगडच्या पायथ्याशी असलेल्या गावात समोर आला आहे. सज्जनगडच्या परळी खोऱ्यातील बोगद्यापलीकडील परिसर, केळवली, सांडवली आणि ठोसेघर भागात सध्या जमिनींच्या खरेदी-विक्रीचे मोठे व्यवहार सुरू आहेत. सज्जनगडच्या पायथ्याशी असणाऱ्या परळी खोऱ्यातील अंबवडे खुर्द येथे जमिनीचे सपाटीकरण करण्यासाठी एका व्यावसायिकाला महसूल विभागाने १ हजार ब्रास उत्खननाची मंजुरी दिली होती. मात्र, व्यावसायिक फायद्यासाठी परळी खोऱ्यातील निसर्गसंपन्न भूप्रदेशाची प्रचंड तोडफोड सुरू आहे. अवैध प्रकाराला महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांचे पाठबळ असल्याचा संशय व्यक्त होत आहे. यामुळे पाण्याचे प्रवाह बदलून शेती, रस्ते आणि वस्त्यांना मोठा धोका निर्माण झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. महसूल विभागाने अवघ्या १ हजार ब्रास मुरूम-माती उत्खननाची परवानगी दिली असताना, प्रत्यक्षात तेथे संपूर्ण डोंगर पोखरल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. महसूल विभागाकडून प्रत्यक्ष पाहणी, मोजणी व पंचनामा करून वस्तुस्थिती स्पष्ट करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

अंबवडे खुर्द येथे एका व्यावसायिकाला १ हजार ब्रास उत्खननाची मंजुरी दिली असताना त्याहून मोठ्या प्रमाणात उत्खनन झाल्याची तक्रार आली आहे. चौकशी केल्यावर अतिरिक्त उत्खनन झाले असल्याचे सिद्ध झाल्यास कडक कारवाई केली जाईल.

– आशीष बारकुल, प्रांताधिकारी, सातारा.

सपाटीकरणाच्या नावाखाली परळी खोऱ्यातील निसर्गरम्य डोंगरच पोखरला जात आहे. यामुळे भविष्यात अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने या गैरप्रकाराची चौकशी करून तत्काळ काम थांबवावे आणि दोषींवर कडक कारवाई करावी.

– बापू वांगडे, स्थानिक ग्रामस्थ, अंबवडे खुर्द, ता. सातारा



‘विद्यार्थ्यांनो, शिकाल तरच टिकाल’ — डॉ. किशोर पाटील

ठाणे : (स. गांवकरी)

- समाज कल्याण न्यासच्या वतीने शारदा विद्यालय, पडघा येथे आदिवासी व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देण्यासाठी समाज कल्याण न्यास, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी शारदा विद्यालय, पडघा येथे आदिवासी, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमाला विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. प्रमोद पाटील यांनी समाज कल्याण न्यासच्या या उपक्रमाचे स्वागत केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साधनसामग्री उपलब्ध करून देणे, आधुनिक शैक्षणिक सुविधा मिळवून देणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, “विद्यार्थ्यांनो, शिकाल तरच टिकाल. त्यामुळे प्रत्येकाने मन लावून अभ्यास करून आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे,” असे आवाहन केले. तसेच स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत त्यांनी समाज कल्याण न्यासचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. श्री. सोन्या काशीनाथ पाटील यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

यावेळी आर.एस.पी.चे नोडल ऑफिसर डॉ. मनिलाल रतिलाल शिंपी यांनी विद्यार्थ्यांना नशामुक्तीचा संदेश देत समाजात नशामुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी समाज कल्याण न्यासने पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी सांगितले. हा संपूर्ण शैक्षणिक मदत उपक्रम समाज कल्याण न्यासचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. श्री. सोन्या काशीनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध होऊन त्यांच्या शिक्षणाला हातभार लागणार असून, शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास डॉ. सोन्या काशीनाथ पाटील यांनी व्यक्त केला. सदर कार्यक्रमास समाज कल्याण न्यासचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. सोन्या काशीनाथ पाटील ,डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील), डॉ. श्री. मनिलाल रतिलाल शिंपी (नोडल ऑफिसर, आर.एस.पी.), श्री. टारझन अनंता पाटील (उपतालुकाध्यक्ष, भिवंडी ग्रामीण), मुख्याध्यापक श्री. प्रमोद पाटील, सहशिक्षक श्री. मंगेश भामरे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुयोग वेखंडे यांनी केले. तर समाज कल्याण न्यासचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. सोन्या काशीनाथ पाटील यांच्यासह संपूर्ण टीमचे आभार सहशिक्षक श्री. मंगेश भामरे यांनी मानले.

तामसा येथे भर चौकात सिनेस्टाईल हाणामारी; हॉटेलमध्ये घुसून मारण्याचा प्रयत्न ?

तामसा: (स. गांवकरी)

तामसा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात भरदिवसा काही टारगट तरुणांमध्ये झालेल्या जोरदार हाणामारीमुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. हाणामारीचा प्रकार तब्बल अर्धा तास सुरू असल्याचे प्रत्यक्षदर्शींकडून सांगण्यात येत असून, या प्रकारामुळे परिसरातील नागरिक व व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. मिळालेल्या माहितीनुसार, काही 8ते 10टारगट तरुणांच्या गटांमध्ये वाद झाल्यानंतर हा प्रकार वाढल्याचे सांगितले जात आहे. संबंधित तरुणांनी एका हॉटेलमध्ये घुसून मारहाण करण्याचा प्रयत्न केल्याचीही चर्चा आहे. भर चौकात सुरू झालेल्या या राड्यामुळे काही काळ वाहतूक व नागरिकांची वर्दळ प्रभावित झाली. या घटनेमुळे तामसा शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या स्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. भरदिवसा सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे हाणामारी होत असेल, तर असामाजिक प्रवृत्तींवर पोलिसांचा धाक राहिला आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, घटनेत सहभागी असलेल्यांमध्ये टारगट मुले असल्याची चर्चा असल्याने पालकांनीही गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

दिव्यात घरफोडीतील ८ लाख ८४ हजारांच्या दागिन्यासह आरोपी अटकेत

ठाणे : (स. गांवकरी)

मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलीस चौकीच्या हद्दीत घरफोडी करून ८ लाख ८४ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. विशेष म्हणजे चोरी करणारा आरोपी हा फिर्यादी राहत असलेल्या त्याच बिल्डिंगमधील रहिवासी असल्याचे तपासात समोर आले आहे. गाळा खरेदी करण्यासाठी पैशांची गरज असल्याने आरोपीने चोरीचे दागिने भांडूप येथील फायनान्स कंपनीत गहाण ठेवल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. दिवा पूर्व येथील गणेश नगर, गणेश पाडा परिसरातील गोविंदधाम अपार्टमेंट, सी विंग येथील रहिवासी सौ. रोहिणी संदीप मेते (वय ३०, व्यवसाय-गृहिणी) यांच्या राहत्या घरात ३ ऑगस्ट २०२६ रोजी घरफोडी झाली होती. या घटनेत त्यांच्या घरातील एकूण ८ लाख ८४ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची तक्रार त्यांनी मुंब्रा पोलीस ठाण्यात करण्यात आली होती.











तिरंगा रॅलीतून समृध्द, विकसित राष्ट्र बनविण्याचा संकल्प -ना. विखे पाटील

अहील्यानगर जिल्ह्यातून हजारो कार्यकर्त्यांचा सहभाग!

लोणी : (स. गांवकरी)

भारतीय जनता पक्षाच्या वतीने संपूर्ण देशात आयोजित करण्यात आलेल्या तिरंगा रॅलीच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सक्षम, समृध्द आणि विकसित राष्ट्र बनिण्यासाठी योगदान देण्याचा संकल्पकेला असल्याचे जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले.लाल किल्ल्यावरून वंदे मातरम् गायनाचा निर्णय मातृभूमीचा गौरव आणि राष्ट्रीय स्वाभिमान वाढविणारा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. छत्रपती संभाजीनगर मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या तिरंगा रॅली जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष डॉ सुजय विखे पाटील यांच्यासह अहील्यानगर जिल्ह्यातून असंख्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.





भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमिताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हर घर तिरंगा उपक्रमाचे आवाहन केले होते.प्रत्येक नागरिकांने घरावर तिरंगा फडकावून देशाप्रती कृतज्ञता व्यक्त असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की, भारतीय जनता पक्षाच्या वतीने संपूर्ण राज्यात काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताला सक्षम समृध्द आणि विकसित राष्ट्र बनविण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

यावर्षीचा स्वातंत्र्य दिन साजरा करताना वंदे मातरम् या गीताला १५० वर्ष पूर्ण होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने ऐंशीव्या स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी लाल किल्ल्यावरून वंदे मातरम् गीत म्हणण्याचा केलेला निर्णय हा प्रत्येक भारतीयासाठी अंत्यत अभिमानास्पद आणि चैतन्यदायी असल्याची प्रतिक्रीया मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केली.

वंदे मातरम् हेमगीत केवळ शब्दांची रचना नसून,आपल्या मातृभूमी प्रति असलेला अथांग प्रेम, त्याग आणि समर्पणाची भावना आहे.भारतीय स्वातंत्र्य लढ्यात देशातील क्रांतिकारकांना आणि स्वातंत्र्य सैनिकांना एका सूत्रात बांधणारा मूलमंत्र वंदे मातरम् मध्ये सामावला आहे. केंद्र सरकारने वंदे मातरम् गीताला १५० वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर लाल किल्ल्यावरून वंदे मातरम् गायनाचा निर्णय केलाच, पण यापेक्षाही महत्वाचे म्हणजे शासकीय आणि सार्वजनिक कार्यकर्माची सुरूवात वंदे मातरम् गीताने करण्याचा केलेला निर्णय राष्ट्र प्रेमाची आणि समृध्द इतिहासाची प्रेरणा देणारी असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.



चाईल्ड फंड इंडिया व बजाज फिनसर्वच्या गावभेटी व बैठका

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



दिनांक १२ ऑगस्ट रोजी चाईल्ड फंड इंडिया च्या Web Safe & Wise-II प्रकल्प क्षेत्रातील सितेवाडी, मढ व तळेरान येथे मान्यवरां ची क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. यावेळी बजाज फिनसर्व च्या नॅशनल लीड, सी.एस.आर श्रीमती लीना राजन,सीनियर मॅनेजर सीएसआर श्रीमती योजना पलसे,कम्युनिकेशन टीमच्या स्वप्ना वाझलवार तसेच चाईल्ड फंड इंडिया चे कार्यकारी संचालक आनंद विश्वकर्मा,सोनिया मदान, कम्युनिकेशन मॅनेजर,शील कुमार, महाराष्ट्र प्रमुख जिनू वर्गीस,जुन्नर येथील वरिष्ट प्रकल्प अधिकारी अभिजीत मदने यांच्यासह सर्व संबंधित कार्यकर्ते उपस्थित होते. सितेवाडी,मढ व तळेरान येथे शाळेतील मूले,शिक्षक, ग्रीन कमिटी सदस्य यांच्याशी ऑनलाईन आणि ऑफलाईन सुरक्षितता संवाद साधला व शाळेची पाहणी केली.यावेळी सितेवाडी गावच्या सरपंच दिपाली पाटेकर,शीतळेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष हांडे,ग्रीन कामेटीचे सदस्य मिथुन मोजाड व इतर शिक्षक,पालक उपस्थित होते. याचबरोबर मढ येथे ९ ते १४ वयोगटातील मुलांशी स्पोर्ट्स फॉर प्रोटेक्शन उपक्रमांबाबत चर्चा केली,तसेच त्यानंतर तळेरान येथे वेब सेफ अँड वाईज प्रकल्प बाबत गाव पातळीवरील बाल संरक्षण समितीतील सदस्यांबरोबर व विविध गावचे सरपंच, उपसरपंच,अंगणवाडी सेविका पोलिस पाटील,शिक्षक, शासकीय,सामाजिक व राजकीय पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली व गावपातळी वरील समस्या व प्रश्न जाणून घेतले व त्यानंतर कम्युनिटी लंच करण्यात आले. संपूर्ण भेट व बैठका अत्यंत नियोजनबद्ध सकारात्मक वातावरणात पार पडल्या. या भेटीमुळे चाईल्ड फंड इंडिया स्थानिक समुदाय यांच्यातील समन्वय अधिक दृढ होण्यास तसेच Web Safe & Wise -II प्रकल्पाची प्रभावी अंमल बजावणी करण्यास मदत होणार आहे. या सर्व भेटीचे व बैठकीचे नियोजन चाईल्ड फंडच्या सर्व टीम ने यशस्वी पार पाडले.

विभागीय आयुक्तांच्या आदेशाची अंमलबजावणी करा

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड जिल्ह्यातील कोतवालांना आपापल्या तलाठी सज्जात कार्य नियुक्त करून घ्या कोतवाल संघटनेनी केलेल्या एका मागणीचा विभागीय आयुक्तांच्या पत्राला नांदेड तहसिलदार यांनी सज्जात महसूल सेवकांना कार्य नियुक्त करीत नसल्याचा महसूल सेवकांनी आरोप करून कोतवाल ऐवजी खासगी लोंकावर तलाठी कार्यालय चालत असुन विभागीय आयुक्तांच्या परिपत्रकाला नांदेड तहसीलदार यांच्या कडून कार्यवाही करण्यात आलेली नाही. ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व महसूल सेवकांनी (कोतवाल) यांनी तहसिल कार्यालय व प्रशासकीय कार्यालयात न ठेवता आपआपल्या तलाठी सज्जात कार्य नियुक्त करून कामकाज करण्याचे आदेश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी १३ मे२६ रोजी दिले होते. परंतु, अद्यापही नांदेड जिल्ह्यातील कोतवाल यांना नेमणुक असलेला सज्जा देण्यात आले नसल्याचे दिसून येत आहे. तलाठी व कोतवाल ही दोन्ही पदे सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत.

विविध प्रकारचे दाखले तसेच शेतकऱ्यांशी निगडीत अतिवृष्टी, दुष्काळी स्थिती, नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीत तलाठी हे माहत्वाचा दुवा आहेत. जनतेस आवश्यक सेवा उपलब्ध होण्यासाठी तलाठ्यांनी सजाच्या ठिकाणी कोतवाल यांना हजर राहण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांनी परिपत्रकानुसार दिल्या होत्या.





विद्यार्थ्यांच्या समस्यांवर कुलगुरूंचा थेट संवादातून सकारात्मक प्रतिसाद

- 'कुलगुरूंशी संवाद' उपक्रमात विद्यार्थ्यांनी मांडल्या विविध समस्या; जागेवरच मार्गदर्शन व उपाययोजनांचे आश्वासन



नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागांतर्गत विद्यार्थी विकास कक्ष समितीच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या 'कुलगुरूंशी संवाद' (Dialogue with the Vice-Chancellor) या अभिनव उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणारी बैठक विद्यापीठाच्या प्रशासकीय मुख्य इमारतीत गुरुवारी (दि. १३ ऑगस्ट) उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यापीठातील विविध शैक्षणिक संकुलांमधील विद्यार्थी प्रतिनिधींनी आपल्या शैक्षणिक, प्रशासकीय तसेच दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध अडचणी, समस्या आणि अपेक्षा कुलगुरूंसमोर थेट मांडल्या. यामध्ये शैक्षणिक बाबी, वसतिगृहातील सुविधा, आरोग्यविषयक सेवा, सामाजिक व आर्थिक अडचणी, अभ्यासक्रम तसेच अभ्यासक्रमेतर उपक्रमांशी संबंधित विविध प्रश्नांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रश्नांचे कुलगुरू डॉ. मनोहर जी. चासकर यांनी गांभीर्याने ऐकून घेतले. अनेक प्रश्नांवर त्यांनी विद्यार्थ्यांना जागेवरच मार्गदर्शन केले, तर संबंधित विभागप्रमुख व अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भौतिक व मूलभूत सुविधांसोबतच शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही तितकेच महत्त्व असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. मनोहर जी. चासकर म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधा, शैक्षणिक गरजा आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या बाबतीत विद्यापीठ प्रशासन कुठेही कमी पडणार नाही. विद्यार्थ्यांनी आपल्या समस्या मोकळेपणाने मांडाव्यात आणि विद्यापीठ प्रशासनाने त्या समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहून तत्परतेने कार्यवाही करावी."

विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच विद्यार्थ्यांशी अशा प्रकारे थेट, मुक्त आणि सुसंवादी संवाद साधण्याचा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या समस्या थेट जाणून घेऊन त्यावर योग्य त्या पातळीवर तातडीने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

कुलगुरूंनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाधान व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. जागेवरच प्रश्नांची उत्तरे आणि मार्गदर्शन मिळाल्याने विद्यार्थ्यांचा विद्यापीठ प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने विविध शैक्षणिक संकुलांतील विद्यार्थी प्रतिनिधींना या संवादासाठी सहभागी करून घेण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या समस्या थेट विद्यापीठाच्या सर्वोच्च प्रशासकीय स्तरापर्यंत पोहोचवून त्यांचे प्रभावी निराकरण करणे, तसेच विद्यार्थी व विद्यापीठ प्रशासन यांच्यातील संवाद अधिक दृढ करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या बैठकीस प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विविध विभागांचे विभागप्रमुख, संचालक, प्राध्यापक, अधिकारी तसेच विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या समस्या ऐकून घेऊन त्यावर सकारात्मक भूमिका व तातडीच्या उपाययोजनांचे आश्वासन देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व समाधानकारक ठरला.

MERITE योजनेत SGGSIET नांदेडची निवड

नांदेड जिल्हा: (स. गांवकरी)



- १८ कोटींचे आर्थिक सहाय्य
- आधीपासून सुविधासंपन्न संस्थेला आधुनिकतेची नवी झेप
- गुणवंत विद्यार्थ्यांची वाढती पसंती

नांदेडच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरली असून, श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था (SGGSIET), नांदेडची केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी MERITE योजनेसाठी निवड झाली आहे. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयामार्फत जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या योजनेअंतर्गत संस्थेला १८ कोटी रुपयांपर्यंतचे कार्यप्रदर्शन-आधारित आर्थिक सहाय्य मिळणार आहे.

MERITE (Multidisciplinary Education and Research Improvement in Technical Education) योजनेचा उद्देश देशातील तांत्रिक शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे, विद्यार्थ्यांची कौशल्ये व रोजगारक्षमता विकसित करणे, बहुविषयक शिक्षणाला चालना देणे तसेच संशोधन, नवोपक्रम आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हा आहे. विद्यार्थ्यांचा कौशल्यविकास, बहुविषयक शिक्षण, संशोधन-नवोपक्रम, नवउद्योजकता परिसंस्था तसेच संस्थात्मक गुणवत्ता व क्षमता विकास या क्षेत्रांवर या योजनेत विशेष भर देण्यात आला आहे. सन १९८१ मध्ये स्थापन झालेली आणि २००४ पासून स्वायत्त असलेली SGGSIET ही गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षणासाठी ओळखली जाणारी संस्था आहे. आधुनिक प्रयोगशाळा, संशोधन सुविधा, उद्योग-संस्था सहकार्य, विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी विविध उपक्रम आणि नवोपक्रमाला प्रोत्साहन देणारे वातावरण संस्थेत आधीपासूनच उपलब्ध आहे. MERITE योजनेमुळे या विद्यमान सुविधांना आणखी अत्याधुनिक आणि सक्षम करण्याची संधी संस्थेला मिळणार आहे. संस्थेच्या गुणवत्तेची वाढती दखल अलीकडील प्रवेश प्रक्रियेतही स्पष्टपणे दिसून आली आहे. सन २०२२ मध्ये सर्व शाखांचा एकत्रित मध्यक पर्सेंटाइल ८६.९३ होता. यावर्षी तो ९३.१९ पर्यंत पोहोचला असून, तब्बल ६.२४ पर्सेंटाइल पॉइंट्सची वाढ झाली आहे. विशेष म्हणजे ९९.७२ पर्सेंटाइल मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांनीही SGGSIET ला पसंती दिली आहे. त्यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये संस्थेत प्रवेश घेण्यासाठीची स्पर्धा वाढली असून, संस्थेची वाढती गुणवत्ता आणि निर्माण होत असलेली मजबूत ओळख अधोरेखित झाली आहे.


संस्थेच्या गुणवत्तेची झलक रोजगाराच्या संधींमध्येही दिसून येते. सन २०२५-२६ मध्ये ५६४ विद्यार्थ्यांना १०० हून अधिक कंपन्यांकडून रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. विद्यार्थ्यांना ६१ लाख रुपयांहून अधिक वार्षिक वेतनाचे पॅकेज मिळाले आहे. तसेच AD Scientific Index 2026 मध्ये संस्थेतील १३६ प्राध्यापक व संशोधकांचा समावेश झाला आहे.

ठाण्यात ९०० खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय लवकरच नागरिकांच्या सेवेत

ठाणे : (स. गांवकरी)



ठाण्यातील सर्वसामान्य, गरीब व गरजू रुग्णांसाठी मोठा दिलासा ठरणारे विठ्ठल सायन्ना रुग्णालय (जिल्हा सामान्य रुग्णालय) डिसेंबरअखेर नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार खासदार नरेश म्हस्के यांनी महापौर शर्मिला पिंपळोलकर, पदाधिकारी, बांधकाम विभाग व महापालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत रुग्णालयाची आज पाहणी केली. 900 खाटांची क्षमता, एअर ॲम्ब्युलन्सची सुविधा, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे आणि सर्व प्रकारच्या उपचार सुविधांनी सज्ज असलेले हे रुग्णालय ठाणेकरांसह संपूर्ण परिसरातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेचे नवे केंद्र ठरणार असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली. यावेळी पाहणी सभागृह नेते हणमंत जगदाळे, शिवसेना गटनेते तथा स्थानिक नगरसेवक पवन कदम, सुधीर कोकाटे, माजी नगरसेविका पूजा वाघ, महापालिकेचे उपायुक्त मनिष जोशी, कार्यकारी अभियंता मोहन कलाल, ऋषिकेश जवळकर, आरोग्य विभागाच्या डॉ. योगिता धायगुडे, माता-बालसंगोपन अधिकारी डॉ. वर्षा ससाणे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या कामांचा आढावा घेताना रुग्णालयातील विविध विभाग, उपचार कक्ष, आपत्कालीन सेवा, अतिदक्षता विभाग, ऑपरेशन थिएटर आणि इतर आवश्यक सुविधांची माहिती घेण्यात आली. या रुग्णालयात 900 खाटांची सुविधा, एअर ॲम्ब्युलन्स, आधुनिक निदान यंत्रणा, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, आयसीयू, विविध सुपर स्पेशालिटी विभाग, कर्करोगावर उपचार तसेच सर्व प्रकारच्या वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे गंभीर रुग्णांवर तातडीने उपचार करणे शक्य होणार असून नागरिकांना मुंबईकडे धाव घेण्याची गरजही मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. गरीब आणि गरजू रुग्णांना एकाच छताखाली दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा या प्रकल्पाचा उद्देश असल्याचे म्हस्के यांनी स्पष्ट केले.







थोडक्यात पण महत्वाचे

राज्यस्तरीय रील मेकिंग स्पर्धेत शार्दूल मोरेला तृतीय क्रमांक!



मुंबई (स. गांवकरी) : के.बी.टी. महाविद्यालयाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय रील मेकिंग स्पर्धेत एनकेटीटी ज्युनिअर कॉलेज सायन्स अँड कॉमर्सच्या वाणिज्य विभागातील विद्यार्थी शार्दूल मोरे याने उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. 'माय इंडिया, माय कमिटमेंट' या संकल्पनेवर आधारित या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांतील सुमारे १ हजार ते १२०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. भारत, भारतीय तरुणाई, पर्यावरण आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवर विद्यार्थ्यांनी रीलच्या माध्यमातून प्रभावीपणे विचार मांडले. त्यामुळे ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि सामाजिक जाणिवेला व्यासपीठ देणारी ठरली. या उपक्रमासाठी ज्येष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना रील निर्मितीच्या तंत्रासोबतच राष्ट्रीय व सामाजिक विषयांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची दृष्टी मिळाली. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी ब्रह्मकुमारी संस्थेच्या वतीने 'सशक्त, मुक्त आणि सक्षम भारत' घडविण्याची शपथ देण्यात आली. शार्दूल मोरेच्या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

'इंडस्ट्री 4.0'च्या युगात विद्यार्थ्यांना करिअरच्या नव्या संधी

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : तंत्रज्ञानाच्या वेगवान विकासामुळे उद्योगक्षेत्रात मोठे बदल होत असून औद्योगिक ऑटोमेशन,इंडस्ट्री 4.0,स्मार्ट तंत्रज्ञान आणि बुद्धिमान उत्पादनाला वाढते महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान,करिअर च्या संधी आणि उद्योगांच्या अपेक्षेनुसार आवश्यक कौशल्यांची माहिती मिळावी, या उद्देशाने समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथे औद्योगिक ऑटोमेशन व इंडस्ट्री 4.0 विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.समर्थ कॉलेज च्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशनइंजिनिअरिंग विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात आय कॅप ऑटोमेशनचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर जयेश मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.त्यांनी औद्योगिक क्षेत्रातील ऑटोमेशनची वाढती गरज, आधुनिक उत्पादन प्रक्रियेत तंत्रज्ञानाची भूमिका तसेच इंडस्ट्री 4.0 मुळे निर्माण होणाऱ्या करिअरच्या संधी याबाबत माहिती दिली.

'मार्केट सेस' रद्द करण्यासाठी २ ऑक्टोबरपासून राज्यव्यापी असहकार आंदोलन

पाच लाख व्यापारी सहभागी होणार!

मुंबई : (स.गांवकरी)

कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून बाजार आवारात तसेच आवाराबाहेर वसूल करण्यात येणारा 'मार्केट सेस' तातडीने रद्द करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीने २ ऑक्टोबरपासून राज्यव्यापी असहकार आंदोलनाची घोषणा केली आहे. या आंदोलनात राज्यातील सुमारे पाच लाख व्यापारी सहभागी होणार असून, 'ना सेस वसूल करणार, ना सेस भरणार' अशी भूमिका व्यापाऱ्यांनी घेतली आहे. सरकारने मागणी मान्य करेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे.

कोल्हापूर येथे झालेल्या राज्यव्यापी व्यापारी परिषदेत हा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे, चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ



महाराष्ट्र इंडस्ट्री अँड ट्रेडचे अध्यक्ष दीपेन अग्रवाल यांच्यासह व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत आंदोलनाची माहिती दिली. व्यापाऱ्यांकडून वस्तू व सेवा कर आकारला जात असताना बाजार समित्यांकडून स्वतंत्र सेस व सेवा शुल्क वसूल केले जात असल्याने व्यापाऱ्यांवर दुहेरी कराचा बोजा पडत असल्याचा आरोप करण्यात आला.

गेल्या तीन वर्षांत मुख्यमंत्री, पणनमंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी अनेकदा चर्चा करूनही ठोस निर्णय झाला नसल्याचे व्यापारी संघटनांनी सांगितले. बाजार समित्यांना सेसच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे ८०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते; मात्र त्यातील मोठा हिस्सा कर्मचारी वेतन व प्रशासकीय खर्चावर होत असल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे बाजार सेस व सेवा शुल्क रद्द करावे, बाजार समित्यांना शासनाकडून स्वतंत्र अनुदान द्यावे, मुख्यमंत्री यांच्यासोबत तातडीने बैठक घ्यावी तसेच बाजार समित्यांचे परवाने ऑनलाइन पद्धतीने देण्यात यावेत, असे ठराव परिषदेत मंजूर करण्यात आले.

महाराष्ट्र चेंबरचे समिती सदस्य व ठाणे जिल्हा घाऊक व्यापारी वेल्फेअर महासंघाचे अध्यक्ष सुरेशभाई ठक्कर यांनी व्यापाऱ्यांनी एकजुटीने या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. २ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या या आंदोलनाची पूर्वतयारी म्हणून राज्यभरातील लोकप्रतिनिधी, व्यापारी संघटना व बाजार समित्यांना निवेदने देण्यात येणार असून, त्यानंतर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा व्यापारी कृती समितीने दिला आहे.

आळंदीत लक्ष्मीनारायण याग दिनी ब्रम्ह ध्वज पूजा उत्साहात

आळंदी : (स.गांवकरी)

श्री क्षेत्र आळंदी ब्रह्मवृंद अनुष्ठान मंडळाकडून माऊलींची पालखी दशमीला परत आल्यावर एकादशी पासून 3 दिवसीय यज्ञाचे अनुष्ठान केले जाते. या निमित्त ब्रम्हध्वज पुजनाने, लक्ष्मी नारायण यागाला प्रारंभ झाला. मंडळाच्या या 43 व्या वर्षी ' श्री लक्ष्मी नारायण' यागाचे तीन दिवसीय यागाचे आयोजन करण्यात आले. वे. मू. निखिल प्रसादे गुरुजी आणि वे. मू. चैतन्य जोशी गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली 'योगीराज मंगल कार्यालय' येथे यज्ञ संपन्न झाला. पहिल्या दिवशी यज्ञाचा प्रारंभ, सायंकाळी ह. भ. प. चिदंबरेश्वर साखरे महाराज यांचे प्रवचन आणि सौ. विदुला व डॉ. सारंग (अप्पा) जोशी यांचे भक्तीपूर्ण गायन झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी हवन, दुपारी वेदसेवा आणि सायंकाळी सत्काराचा कार्यक्रम झाला. या वेळेस वे. मू. प्रकाशशास्त्री दंडगे गुरुजी, वे. मू. विवेक विश्वनाथशास्त्री जोशी, ज्येष्ठ नागरिक म्हणून शैलाताई व दत्तात्रय हरिभाऊ कुलकर्णी यांचा आणि नैपुण्य प्राप्त विद्यार्थी यांचे सत्कार झाले. वे. मू. अशोकशास्त्री कुलकर्णी गुरुजी हे अध्यक्ष व वे. मू. अनंतशास्त्री मुळे प्रमुख पाहुणे लाभले. विश्वस्त बाळासाहेब पोफळे, यजमान प्रशांत मुळे तसेच अरविंद जोशी आणि संदीप कुलकर्णी यांच्या हस्ते विविध सत्कार झाले. सूत्रसंचालन वे. मू. चितळे गुरुजी आणि कु. श्रावणी जोशी यांनी केले. तिसऱ्या दिवशी पूर्णाहुती झाल्यावर महाप्रसादाचे सेवन झाले. कार्यक्रमात आळंदीतील वेदपाठशाळेतील विद्यार्थी व गुरुजन उपस्थित होते.

जिल्हा परिषद ठाणे व Union Bank of India यांच्यात सामंजस्य करार

ठाणे : (स.गांवकरी)

जिल्हा परिषद, ठाणे आणि Union Bank of India यांच्यात अधिकारी व कर्मचाऱ्यांना विविध आर्थिक सुविधा तसेच आरोग्य विमा आणि इतर लाभ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आज दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. बी. जे. हायस्कूल येथे आयोजित कार्यक्रमात हा सामंजस्य करार पार पडला.



या सामंजस्य कराराच्या माध्यमातून जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतन खात्याच्या अनुषंगाने विविध आर्थिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सहकार्य करण्यात येणार आहे. यामध्ये आरोग्य विम्यासह कर्मचाऱ्यांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन विविध बँकिंग व आर्थिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर, कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर, बांधकाम विभाग प्रमुख दिपाली घोरपडे, समाजकल्याण विभाग प्रमुख उज्ज्वला सपकाळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांच्यासह सर्व गटविकास अधिकारी, तालुकास्तरीय विभागप्रमुख, संबंधित अधिकारी व कर्मचारी तसेच युनियन बँक ऑफ इंडिया यांचेकडून श्री अमित भाटिया डीजीएम प्रादेशिक कार्यालय ठाणे व श्री सावन शिव एजीएम हे उपस्थित होते. जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतन खात्याच्या माध्यमातून अधिकाधिक चांगल्या आर्थिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडून विविध बँकांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या सुविधांची माहिती अधिकारी-कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. आरोग्य विमा तसेच इतर आर्थिक लाभांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीनेही फायदा होणार आहे. बँकिंग सुविधांचा लाभ घेताना कर्मचाऱ्यांना योग्य आर्थिक नियोजन, बचत, गुंतवणूक आणि उपलब्ध आर्थिक पर्यायांची माहिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठीही जिल्हा परिषद पुढाकार घेणार आहे. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, आर्थिक गुंतवणूक आणि आर्थिक नियोजन हे प्रत्येकाच्या भविष्यासाठी महत्त्वाचे आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतन खात्याच्या माध्यमातून चांगल्या आर्थिक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या बँकांच्या विविध योजनांची माहिती यापुढेही जिल्हा परिषदेमार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.

घरकुल, घनकचरा व्यवस्थापन, जलजीवन मिशनसह विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा

मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

ठाणे : (स.गांवकरी)



जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत बी. जे. हायस्कूल येथे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या अध्यक्षतेखाली मासिक समन्वय सभा पार पडली. जिल्ह्यातील विविध विकासकामे, शासनाच्या योजनांची अंमलबजावणी, प्रशासकीय कामकाज, नागरिकांना मिळणाऱ्या सेवा-सुविधा तसेच प्रलंबित कामांचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर, कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर, बांधकाम विभाग प्रमुख दिपाली घोरपडे, समाजकल्याण विभाग प्रमुख उज्ज्वला सपकाळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांच्यासह सर्व गटविकास अधिकारी, तालुकास्तरीय विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेताना प्रलंबित कामे निश्चित कालमर्यादित पूर्ण करावीत. शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करताना कोणत्याही प्रकारची हलगर्जी किंवा दिरंगाई होऊ नये, असे स्पष्ट निर्देश रणजित यादव यांनी दिले. ग्रामपंचायत स्तरावरील घनकचरा व्यवस्थापन हा बैठकीतील महत्त्वाचा विषय ठरला. ग्रामपंचायतींनी पुढाकार घेऊन क्लस्टर पद्धतीने सामूहिक घनकचरा व्यवस्थापन व्यवस्था उभारण्याचे नियोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या. कचरा संकलन, प्रक्रिया आणि विल्हेवाटीसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याबरोबरच नागरिकांमध्ये सातत्याने जनजागृती करणे गरजेचे असल्याचे यादव यांनी स्पष्ट केले. घनकचऱ्यावर योग्य प्रक्रिया करण्यासाठी तज्ज्ञांची मदत घ्यावी. ज्या ग्रामपंचायतींकडे प्रक्रिया केंद्रासाठी जागा उपलब्ध नाही, तेथील जागेचे प्रश्न तातडीने सोडवावेत, असेही निर्देश देण्यात आले. जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांची तालुकानिहाय प्रगती तपासण्यात आली. सुरू असलेली कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे आणि कामांच्या प्रगतीवर नियमित देखरेख ठेवावी, असे निर्देश देण्यात आले. कामांच्या प्रगतीनुसार निधी उपलब्ध होणार असल्याने कोणतेही काम प्रलंबित ठेवू नये, असेही स्पष.

घरकुल योजनांना गती देण्याचे निर्देश

ग्रामीण भागातील नागरिकांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. घरकुलांची बांधकामे निर्धारित कालावधीत पूर्ण करून लाभार्थ्यांना वेळेत घराचा लाभ मिळवून द्यावा. प्रलंबित प्रकरणांचा तालुकानिहाय आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले.

महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महामंत्री अरुण पिवळ यांची भविष्य निर्वाह निधी न्यासाच्या विश्वस्तपदी नियुक्ती

मुंबई : (स.गांवकरी)



महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या भविष्य निर्वाह निधी न्यासाच्या (CPF Trust) कर्मचारी विश्वस्त (Trustee) पदी महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महामंत्री श्री. अरुण पिवळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांच्या नियुक्तीचे आदेश महाराष्ट्र वीज कामगार महासंघास प्राप्त झाले. महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे माजी विश्वस्त श्री. दत्ताजी न्हावकर यांच्या निवृत्तीमुळे विश्वस्तपदाची जागा रिक्त झाली होती. या रिक्त जागेवर महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या वतीने श्री. अरुण पिवळ यांचे नाव नामनिर्देशित करण्यात आले होते. त्यानुसार भविष्य निर्वाह निधी न्यास व प्रशासनाच्या वतीने त्यांच्या नियुक्तीचे आदेश जारी करण्यात आले. श्री. अरुण पिवळ यांनी २४ नोव्हेंबर १९९७ रोजी तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ऑपरेटर म्हणून दिंडोरी उपविभाग, नाशिक येथे सेवेला सुरुवात केली. सध्या ते सिडको उपविभाग, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहेत.

कामगार संघटनेच्या क्षेत्रातही त्यांनी विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या आहेत. छत्रपती संभाजीनगर येथे सर्कल संघटक, सर्कल कार्याध्यक्ष, झोन अध्यक्ष तसेच महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे वितरण कंपनीचे कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे.

सध्या ते महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महामंत्री, भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाचे उपाध्यक्ष आणि अखिल भारतीय विद्युत मजदूर महासंघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्यरत आहेत. तसेच दत्तोपंत ठेंगडी राष्ट्रीय श्रमिक शिक्षा व विकास बोर्ड, श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार, रिजनल डायरेक्टर ऑफिस, नाशिक यांच्या रिजनल ॲडव्हायझरी कमिटीचे सदस्य म्हणूनही ते कार्यरत आहेत.

कामगारांच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास, संघटनात्मक अनुभव आणि प्रशासनाशी समन्वय साधण्याची क्षमता या पार्श्वभूमीवर श्री. पिवळ यांची भविष्य निर्वाह निधी न्यासाच्या विश्वस्तपदी झालेली नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे.



नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २४२। किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026



शनिवार दि. १५ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

चाकण एमआयडीसीतील समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

पुणे (समर्थ गांवकरी)



चाकण एमआयडीसीतील रस्ते, वाहतूक कोंडी आणि इतर पायाभूत सुविधा संबंधी अडचणी प्राधान्याने सोडविण्यात येतील, अशी माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली व उद्योजकांना आश्वस्त केले आहे. यासाठी चाकण येथील उद्योजक, एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी तसेच स्थानिक व जिल्हा प्रशासनासोबत लवकरच बैठक घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज चाकण नागरी कृती समिती व औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी धनंजय शेडबाळे यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. यावेळी उद्योजकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडविण्याबाबत त्यांना आश्वस्त केले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने निर्देश या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन उपमुख्यमंत्र्यांनी एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी,पीएम आरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी,पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, खेडचे प्रांत अधिकारी अनिल दौंडे आणि चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी अंकुश जाधव यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

विवेक नायकल यांची फ्री टाईल कुस्ती स्पर्धेच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड

शिर्डी (समर्थ गांवकरी)

युरोप खंडातील स्लोवाकिया येथे पार पडणाऱ्या जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी कोकामठाण येथील आत्मा मालिक कुस्ती केंद्राचे इंटरनॅशनल कोच विवेक नायकल यांची भारतीय कुस्ती महासंघ आणि भारतीय ऑलिंपिक संघ यांचे वतीने फ्री टाईल कुस्ती संघाच्या मुख्य प्रशिक्षक पदी निवड करण्यात आली आहे.

युनायटेड वर्ल्ड रेसलिंग या जागतिक संघटनेच्या मान्यतेने या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून भारतीय पैलवानांच्या तयारीसाठी आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी विवेक नायकल यांचे मोलाचे मार्गदर्शन ठरणार आहे.

या पूर्वी मार्च महिन्यात पार पडलेल्या लेव्हल -२ इंटरनॅशनल कोचींग कोर्स म ध्ये त्यांनी एफ श्रेणीत उत्तम यश संपादन केले होते. तसेच २०२४ मध्ये अल्बेनिया-युरोप येथे झालेल्या जागतिक कुस्ती स्पर्धेत ही त्यांनी भारतीय संघाचे प्रशिक्षक म्हणून मोलाची जबाबदारी सांभाळली होती. विवेक नायकल हे सध्या प.पू. आत्मा मालिक माऊलींच्या आशीर्वादाने कोकमठाण येथील आत्मा मालिक ध्यानपीठाच्या कुस्ती केंद्रात



प्रमुख कोच म्हणून सेवा देत आहे. त्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल आत्मा मालिक परिवाराच्या वतीने पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यातील ५ पोलीस अधिकाऱ्यांची राष्ट्रपती पदकासाठी निवड

मुंबई (समर्थ गांवकरी)



पोलीस, कारागृह आणि नागरी संरक्षण दलात उल्लेखनीय आणि उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल दिल्या जाणाऱ्या मानाच्या राष्ट्रपती पदकांसाठी महाराष्ट्रातील ५ अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून याबाबतची घोषणा करण्यात आली.

केंद्रीय गृह मंत्रालयाने १४ ऑगस्ट रोजी देशभरातील विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना जाहीर झालेली शौर्य, उत्कृष्ट सेवा आणि गुणवत्तापूर्ण सेवा पदके घोषित केली. यामध्ये मानाच्या राष्ट्रपती उत्कृष्ट सेवा पदकासाठी पोलीस श्रेणीतून महाराष्ट्राचे अपर पोलीस महासंचालक शिरीष रवींद्र जैन, उपपोलीस अधीक्षक सुभाष नानासाहेब भुजबळ आणि साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय राजाराम वायचळे यांची निवड झाली आहे. तर कारागृह सेवा गटातून सुभेदार संजीव सखाराम घाणेकर आणि हवालदार संजय राजारामजी तळवारे यांना राष्ट्रपती उत्कृष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे.

याशिवाय, गुणवत्तापूर्ण सेवा पदकांसाठी पोलीस सेवा श्रेणीत महाराष्ट्रातील ३७ अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.


राज्यात १ सप्टेंबरपासून 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत', महसूलमंत्र्यांची घोषणा; पुणे पॅटर्नच्या यशानंतर राज्यव्यापी अंमलबजावणी

मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्यातील मंडळ अधिकाऱ्यांपासून ते जिल्हाधिकाऱ्यांपर्यंतच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये वर्षानुवर्षे रेंगाळलेल्या जमिनीच्या महसुली दाव्यांचा त्वरित आणि कायमस्वरूपी निपटारा करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. क्रान्तिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून राज्यात १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबवण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी केली.

महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी (एसडीओ), उपजिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या न्यायालयात जमिनींशी संबंधित हजारो दावे प्रलंबित आहेत. एखाद्या प्रकरणात निकाल लागला तरी असंतुष्ट पक्षकार वरिष्ठ न्यायालयात पुन्हा अपील किंवा पुनरीक्षण अर्ज दाखल करतात. यामुळे नागरिकांचा वेळ व पैसा वाया जातो आणि प्रशासनावरील ताण वाढतो. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याम ध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात आलेल्या 'महसूल लोक अदालत' उपक्रमाला मोठे यश मिळाले होते. त्यामुळे पुणे पॅटर्नच्या धर्तीवर आता संपूर्ण महाराष्ट्रात ही मोहीम राबवली जाणार आहे.

या अभियानांतर्गत मंडळ अधिकाऱ्यांपासून ते जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत सर्व स्तरांवर दर तीन महिन्यांतून एकदा महसूल लोक अदालतीचे आयोजन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या



पक्षकारांचा महसुली दावा किंवा अपील प्रलंबित आहे, ते दोन्ही पक्षकार किंवा त्यांचे वकील 'प्रपत्र-अ' मधील नमुन्यात तडजोडीसाठी अर्ज करू शकतील.

उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यात बोगदा दुर्घटना, ७ ठार आणि ३ अद्याप बेपत्ता

चमोली : उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यातील जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला आहे. अद्याप तीन जण बेपत्ता आहे. बेपत्ता असलेल्यांचा शोध सुरू आहे. बोगद्यात झालेल्या पडझडीमुळे संकटात सापडलेल्यांपैकी १२ जणांची सुरक्षित सुटका करण्यात यश मिळाले आहे. NDRF आणि SDRF तसेच राज्य पोलीस, CISF, ITBP आणि जिल्हा प्रशासन मदतकार्य करत आहे.

ज्यावेळी पडझड सुरू झाली त्यावेळी बोगद्यात अधिकारी-कर्मचारी असे एकूण २२ जण होते. त्यापैकी १२ जणांना वाचवले आहे. सात जणांचा मृत्यू झाला. मृतांचे मृतदेह पण बोगद्याबाहेर आणले आहेत. आता सततच्या पावसामुळे आणि बोगद्यातील पाण्याची पातळी वाढत असल्यामुळे बचावकार्यात अडथळा येत आहे.

जलविद्युत प्रकल्पासाठी तयार होत असलेल्या बोगद्याची सध्याची एकूण लांबी अडीच किलोमीटर एवढी आहे. या बोगद्यात सुमारे सहा फूट उंचीपर्यंत पाणी शिरले आहे. पाण्याचा वेगवान प्रवाह आणि ऑक्सिजनची कमी झालेली पातळी तसेच भूस्खलनाचा धोका यामुळे मदतकार्याचा वेग मंदावला आहे. सुरक्षेची खबरदारी घेऊन मदतकार्य सुरू आहे.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी चमोली येथील बोगद्यातील दुर्घटनेची दंडाधिकारी चौकशी करण्याचे आदेश दिले असून, या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची नुकसान भरपाई जाहीर केली आहे.

कल्याण ते बदलापूर वीजपुरवठा बंद; 'या' भागांत सकाळी ६ ते ११ पर्यंत शटडाऊन

कल्याण (समर्थ गांवकरी)



कल्याण, डोंबिवली परिसरासह टिटवाळा, अंबरनाथ आणि बदलापूरमधील नागरिकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. शुक्रवार, १४ ऑगस्ट रोजी वडोदरा-मुंबई एक्स्प्रेसवेच्या कामासाठी काही भागांत नियोजित वीजपुरवठा खंडित केला जाणार आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (छक्रख) प्रकल्पासाठी महापारेषणची पडघा-मोहने १०० केव्ही वीजवाहिनी बंद ठेवण्यात येणार असल्याने हा वीजपुरवठा खंडित होणार आहे. महावितरणच्या कल्याण मंडळातील माहितीनुसार, सकाळी ६ ते ११ या कालावधीत कल्याण मंडळ क्रमांक १ आणि २ अंतर्गत विविध भागांत टप्प्याटप्प्याने वीजपुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी घरातील तसेच व्यावसायिक कामांचे नियोजन त्यानुसार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कुठे आणि किती वेळ वीज बंद?

टिटवाळा, मांडा, बल्याणी आणि अंबिवली रोड परिसरात सकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित राहण्याची शक्यता आहे. तर खडकपाडा, बारावे, चिकणघर, रामबाग, कर्णिक रोड, पौर्णिमा चौक, रेल्वे हॉस्पिटल आणि रुक्मिणीबाई रुग्णालय परिसरात सुमारे पाच तासांचा वीजपुरवठा खंडित राहणार आहे. याशिवाय योगीधाम, गौरीपाडा, शहाड, बिरला कॉलेज, इंदिरानगर, म्हाडा कॉलनी, कोकण वसाहत आणि संदीप हॉटेल परिसरावरही या नियोजित वीजखंडितचा परिणाम होणार आहे.

पाणीपुरवठ्यावरही परिणामाची शक्यता

वीजपुरवठा बंद राहिल्यामुळे घउञ्चउच्या बारावे आणि अटाळी पाणीपुरवठा पंपांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही भागांमध्ये पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक प्रभावित होऊ शकते.

भारताची जागतिक नेतृत्वाच्या दिशेने तर महाराष्ट्राची ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीच्या दिशेने वाटचाल

स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित स्वागत समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

मुंबई (समर्थ गांवकरी)



भारताची जागतिक नेतृत्वाच्या दिशेने तर महाराष्ट्राची ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मुंबईतील ताज हॉटेल येथे आयोजित स्वागत समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित राजनैतिक अधिकारी, वाणिज्यदूत, विविध देशांचे प्रतिनिधी आणि मान्यवरांचे स्वागत केले. भारताची प्रगती, महाराष्ट्राची आर्थिक ताकद आणि भविष्यातील विकासदृष्टी यांचा यावेळी त्यांनी आढावा घेतला. मुख्यमंत्री यांच्या पत्नी अमृता फडणवीस, विविध देशांचे महावाणिज्य दूत, कौन्सुलर कॉर्प्सचे डीन आणि पोलंडचे महावाणिज्य दूत थॉमस, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मंत्री छगन भुजबळ, मंगलप्रभात लोढा, आदिती तटकरे, राज्यमंत्री योगेश कदम, महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, वरिष्ठ पोलीस अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारत ही जगातील सर्वात प्राचीन आणि वैविध्यपूर्ण संस्कृतींपैकी एक असून समावेशकता, सहिष्णुता आणि विविध विचारांचा स्वीकार ही देशाची वैशिष्ट्ये आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत आज अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि जागतिक घडामोडींमध्ये निर्णायक भूमिका बजावणारा देश म्हणून उदयास येत आहे. जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारताने स्थान प्राप्त केले असून लवकरच पाच ट्रिलियन डॉलर्सपेक्षा मोठ्या अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या दशकात भारताने गरिबी निर्मूलन, पायाभूत सुविधा विकास, नवकल्पना, तंत्रज्ञान आणि मानव संसाधन निर्मिती या क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. भारतीय प्रतिभेने केवळ देशातीलच नव्हे तर जागतिक उद्योगविश्वालाही दिशा दिली आहे. हा नवा भारत विकासाचे नवे मानदंड निर्माण करीत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

महाराष्ट्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेचे शक्तिकेंद्र असल्याचे सांगताना त्यांनी राज्याची औद्योगिक, तांत्रिक आणि नवोन्मेष क्षेत्रातील आघाडी अधोरेखित केली.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांच्या नियमावलीविरोधात एसएफआयचे घोडेगावात आंदोलन

मंचर (समर्थ गांवकरी)



आदिवासी विकास विभागाने ५ ऑगस्ट २०२६ रोजी शासकीय आदिवासी वसतिगृहांसाठी जारी केलेली सुधारित नियमावली विद्यार्थीविरोधी असून ती तात्काळ रद्द करावी, या मागणीसाठी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय), पुणे जिल्हा समितीच्या वतीने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव येथे शुक्रवारी आंदोलन करण्यात आले.

एसएफआयने वयोमर्यादा २६ वरून पदव्युत्तर व संशोधन विद्यार्थ्यांसाठी ३० वर्षे करावी, पालकांच्या अडीच लाख रुपयांच्या उत्पन्नाची मर्यादा सहा लाख रुपये करावी, दुसरी पदवी किंवा व्यावसायिक अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृह नाकारण्याची अट रद्द करावी, अशी मागणी केली. तसेच पाच किंवा पंधरा किलोमीटर अंतराच्या निकषामुळे प्रवेश नाकारू नये, विवाहित विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा, शिक्षणातील दोन वर्षांपर्यंतचा खंड ग्राह्य धरावा आणि ऑनलाइन प्रक्रियेत अडचणी आल्यास विद्यार्थ्यांना दुरुस्तीची संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांना किमान चार हजार रुपये निर्वाह भत्ता, मुलींना स्वच्छता भत्ता, गणवेश भत्ता, चांगले भोजन, अभ्यासिका, इंटरनेट, ई-ग्रंथालय, आरोग्य सुविधा व समुपदेशन केंद्र उपलब्ध करून द्यावे. विद्यार्थ्यांच्या संघटन स्वातंत्र्यावर निर्बंध घालू नयेत, अशीही मागणी करण्यात आली.

या मागण्यांबाबत सहाय्यक प्रकल्प अधिकारी संदिप पाटील यांच्याशी चर्चा झाली. मागण्या वरिष्ठ कार्यालयाकडे तातडीने पाठविण्याचे आश्वासन त्यांनी दिले. मागण्या मान्य न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा एसएफआयने दिला.

यावेळी एसएफआयचे राज्य उपाध्यक्ष नवनाथ मोरे, राज्य सहसचिव निशा साबळे, पुणे जिल्हाध्यक्ष संस्कृती गोडे, सचिव अक्षय घोडे, आंबेगाव तालुकाध्यक्ष समीक्षा केदारी, सचिव रोहिदास फलके, मयूर हिले, प्रियंका गोडे, आकाश खामकर, कुणाल दाभाडे, प्रिया पारधी व विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

मध्य रेल्वेवर स्वातंत्र्यदिनापासून १५ डब्यांच्या आणखी २२ लोकल धावणार

मुंबई (समर्थ गांवकरी)



मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील वाढती गर्दी कमी करण्यासाठी आणखी २२ उपनगरीय लोकल गाड्यांचे १२ डब्यांवरून १५ डब्यांमध्ये श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. १५ ऑगस्टपासून या गाड्या १५ डब्यांसह धावणार असून, प्रत्येक लोकलची प्रवासी क्षमता सुमारे २५ टक्क्यांनी वाढणार आहे. या निर्णयाचा विशेष फायदा अंबरनाथ, बदलापूर, कर्जत आणि खोपोली परिसरातून प्रवास करणाऱ्या नागरिकांना होणार आहे. (चौथलरळ डेलरश्र) या श्रेणीवर्धनानंतर मध्य रेल्वेवरील १५ डब्यांच्या लोकल सेवांची संख्या ३२ वरून ५४ होणार आहे. नव्याने १५ डब्यांच्या करण्यात येणाऱ्या २२ सेवांपैकी ११ सेवा गर्दीच्या वेळेत धावणार आहेत. यामध्ये सीएसएमटी-कर्जत आणि खोपोली-कर्जत मार्गावरील लोकलचा समावेश आहे. गर्दीच्या वेळेतील महत्त्वाच्या सेवांमध्ये सकाळी ८.२७ वाजता धावणारी अंबरनाथ-सीएसएमटी लोकल आणि सकाळी १० वाजताची खोपोली-कर्जत लोकल १५ डब्यांची होणार आहे. तसेच सायंकाळी ७.४२ वाजताची सीएसएमटी-अंबरनाथ आणि ७.५० वाजताची सीएसएम टी-कर्जत लोकलही १५ डब्यांसह धावणार आहे. दरम्यान, १५ डब्यांच्या रेकमुळे काही विद्यमान सेवांच्या मार्गातही बदल करण्यात येणार आहेत. खोपोली-परेल सेवा दादरपर्यंत, तर सीएसएमटी-अंबरनाथ सेवाही दादरपर्यंत चालवण्यात येणार आहे. मात्र, मध्य रेल्वेच्या उपनगरीय सेवांची एकूण संख्या १,८२० इतकीच राहणार आहे. मध्य रेल्वेने टप्प्याटप्प्याने १५ डब्यांच्या लोकलची संख्या वाढवण्यास सुरुवात केली आहे. पहिली १५ डब्यांची लोकल १६ ऑक्टोबर २०१२ रोजी सुरू झाली होती. त्यानंतर एप्रिल २०१९ मध्ये सहा आणि २० जुलै २०२६ रोजी आणखी १० सेवांचे श्रेणीवर्धन करण्यात आले. आता आणखी २२ सेवांची भर पडल्याने मुख्य मार्गावरील प्रवाशांना वाढीव प्रवासी क्षमता उपलब्ध होणार आहे.

नवी मुंबई येथील सिडकोच्या अखत्यारीतील १४ स्थानके मध्य रेल्वे प्रशासनाकडे हस्तांतरित

■ स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला रेल्वे प्रवाशांना मोठी खुशखबर; प्रवास होणार अधिक सुखकर

■ खासदार नरेश म्हस्के यांच्या पाठपुराव्याला मोठे यश



ठाणे/नवी मुंबई (समर्थ गांवकरी)

सिडको प्रशासनाच्या ताब्यात असलेल्या रेल्वे स्थानकांची देखभाली अभावी पार दुरावस्था झाली होती. यामुळे रेल्वे प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. निवडून आल्यानंतर ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी ही समस्या सोडविण्यासाठी युध्दपातळीवर सिडको, मध्य रेल्वे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या होत्या. तसेच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली होती. आज स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला नवी मुंबई येथील सिडकोच्या अखत्यारीतील ट्रान्स हार्बर आणि हार्बर लाईनवरील उर्वरित १४ रेल्वे स्थानके मध्य रेल्वे प्रशासनाकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या हस्तांतरणामुळे आता स्थानकांवरील प्रवासी सुविधा, स्वच्छता, दुरुस्ती आणि व्यवस्थापन अधिक सक्षमपणे होणार असून नवी मुंबई व ठाणे मतदारसंघातील लाखो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मध्ये रेल्वे आणि सिडको प्रशासन यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे गेली अनेक वर्ष नवी मुंबईकर रेल्वे प्रवाशांचे प्रचंड हाल होत होते. दोन्ही प्राधिकरणे एकमेकांकडे बोट दाखवत असल्याने रेल्वे प्रवासी मात्र यात भरडला जात होता. खासदार नरेश म्हस्के यांनी याची गंभीर दखल घेत दोन्ही प्राधिकरणातील अधिकाऱ्यांचा समन्वय घडवून आणत नवी मुंबईतील शिवसेना पदाधिकाऱ्यांसह मे २०२६ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज स्थानक येथील मध्य रेल्वेच्या मुख्यालयात बैठक घेतली होती. या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन येत्या ६ महिन्यात सिडकोच्या अखत्यारीतील सर्व स्थानके मध्य रेल्वेकडे हस्तांतरण करण्याचे रेल्वे प्रशासनाने मान्य केले होते. एकूण १७ स्थानकांपैकी ३ स्थानके यापूर्वीच जून २०२६ मध्ये हस्तांतरित करण्यात आली होती, तर आज उर्वरित १४ स्थानकांची हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्याने आता या सर्व स्थानकांचा कारभार पूर्णपणे मध्य रेल्वे प्रशासनाकडे गेला आहे. विशेष म्हणजे, हस्तांतरित झालेल्या या १४ स्थानकांपैकी ११ रेल्वे स्थानके ही खासदार नरेश म्हस्के यांच्या ठाणे लोकसभा मतदारसंघात येतात. या प्रक्रियेत मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांचे देखील सहकार्य लाभले. यातील खांदेश्वर, मानसरोवर आणि खारघर हि रेल्वे स्थानके त्यांच्या लोकसभा मतदारसंघात येतात. सहा म हिन्यांची वेळ दिलेली असतांना दोन्ही प्राधिकरणांनी मुदतीपूर्वी प्रश्न सोडविल्याने खासदार नरेश म्हस्के यांनी सिडको आणि मध्य रेल्वे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे मानले विशेष आभार

खासदार म्हणून पदभार स्वीकारल्यापासून प्रवाशांकडून रेल्वे स्थानकांच्या दुरवस्थेबाबत सतत तक्रारी येत होत्या. सिडको आणि रेल्वे प्रशासनात योग्य समन्वय नसल्यामुळे सामान्य प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. रेल्वे सल्लागार समितीचे (Consultative Committee on Railways) सदस्य या नात्याने खासदार नरेश म्हस्के यांनी हा विषय बैठकांमध्ये वारंवार मांडला. याची गंभीर दखल घेत केंद्रीय रेल्वे मंत्री श्री. अश्विनी वैष्णव यांनी हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश दिले होते. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल खासदार म्हस्के यांनी रेल्वे मंत्र्यांचे विशेष आभार मानले आहेत.

हस्तांतरित झालेली १४ रेल्वे स्थानके – १. वाशी, २. सानपाडा, ३. जुईनगर, ४. नेरूळ, ५. सीवूड्स–दरावे, ६. बेलापूर, ७. ऐरोली, ८. रबाळे, ९. घणसोली, १०. कोपरखैरणे, ११. तुर्भे, १२. खांदेश्वर, १३. मानसरोवर, १४. खारघर.

हस्तांतरण प्रक्रियेवेळी मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना उपनेते विजय चौगुले, शिवसेना ऐरोली जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, बेलापूर जिल्हाप्रमुख किशोर पाटकर, रायगड जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उरण जिल्हाप्रमुख विनोद साबळे, गटनेते मनोज हळदणकर, संपर्कप्रमुख अंकुश कदम, महिला जिल्हाप्रमुख सरोजताई पाटील, शीतलताई कचरे, युवा सेना जिल्हाप्रमुख अनिकेत म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, विजय माने, नगरसेवक अमित पाटील, सौरभ शिंदे, अंकुश सोनावणे, आकाश मढवी, कविता पाटील, देवकी शिंदे, साहिल चौगुले, देवेंद्र पाटील, चेतन पाटील, राजू पाटील, साईनाथ वाघमारे, दत्ता घंगाळे, सुरेश कुलकर्णी, संजीव कुलकर्णी (DRUCC MEMBER सेंट्रल रेल्वे), अजित दुबे आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

हस्तांतरण प्रक्रियेला उपस्थित असलेले वरिष्ठ अधिकारीः सिडको (CIDCO) प्रशासन – राजा दयानिधी (JMD –१, सिडको), पी. एस. फुलारी (मुख्य अभियंता, नवी मुंबई), संतोष ओभासे (अतिरिक्त मुख्य अभियंता– III), व्ही. एल. पितळे (अधीक्षक अभियंता, रेल्वे), मध्य रेल्वे प्रशासन अभिषेक कुमार गुप्ता (DEN (HB)/ CSMT), जवाहर गेंडले (DEE/G/CSMT), संतोष कुमार गुंजन (DEN/JNJ) यांच्यासह मध्य रेल्वे आणि सिडकोचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शासनाच्या कर्जमुक्ती योजने अंतर्गत जिल्हा बँकेतील शेतकरी सभासदांच्या खाती ६२७.४७ कोटी रक्कम जमा : जिल्हा बँक प्रशासक श्रीमती संगिता डोंगरे

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत जिल्हयातील बँकेच्या २७७ शांखा मार्फत १३६६ प्राथमिक वि का सेवा सह संस्थांच्या ६६१४७ थकीत पिक कर्जदार सभासंदाना त्यांचे खाती शासना मार्फतची प्राप्त झालेली रक्कम रु ६२७.४७ कोटीची रक्कम जिल्हा बँक मार्फत जमा करण्यात आलेची माहिती अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रशासक श्रीमती संगिता डोंगरे यांनी दिली.

याप्रसंगी बँकेचे प्रशासक श्रीमती संगिता डोंगरे यांनी माहिती देताना पुढे सांगितले की, आधारप्रम ाणीकरणासाठी शासनाकडुन प्राप्त झालेल्या पहिल्या यादी मधील एकुण ११६५१२ कर्जदार सभासदा पैकी आज अखेर एकुण १०५२२८ सभासदांनी आधारप्रमाणीकरण पुर्ण केलेले एकुण ११२८४ शेतकरी सभासदांचे आधारप्रम ाणीकरण मयत, अँग्रीस्टक फार्मर आयडी नसणे, परगावी/स्थलांतरीत, बायोमॅट्रिक कॅप्चर न होणे, व इतर कारणांमुळे प्रमाणीकरण झालेले नसल्याने प्रशासक श्रीमती डोंगरे यांनी ज्या शेतकरी सभासदांचे प्रमाणीकरण प्रक्रिया होऊ शकेल अशा सर्व शेतकरी सभासदांकडे बँक व संस्थे मार्फत पाठपुरावा करुन आधारप्रमाणीकरण करुन घेणेची प्रक्रिया चालू असुन आधारप्रमाणी प्रक्रिया पुर्ण होऊ शकत असलेल्या सर्व शेतकरी सभासदांना बँके मार्फत आधारप्रमाणीकरण प्रक्रिया पूर्ण करुन घेण्याचे अवाहन केले

जिल्हयातील विविध कार्यकारी संस्थांच्या थकीत पिक कर्जदार सभासदांची एकुण १९२२८२ कर्जखात्याची रक्कम रु २४१९.१५ कोटी शासन पोर्टलवर अपलोड केलेली होती. पैकी रु २/– लाखांपर्यत कर्जखाते संख्या १६१२१७ रक्कम रु १४९५.३७ कोटीची असुन शासन योजनेच्या ओटीएस अंतर्गत कर्जखाते संख्या ३१०६५ असुन त्यांची रक्कम रु ९२३.७८ कोटी आहे. सदरहू माहिती बँकेनी शासन पोर्टलवर अपलोड केलेली असलेची माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे यांनी दिली. या योजनेतील पात्र सभासदांपैकी जे सभासद मयत आहेत अशा मयतांच्या कर्जखात्यांना वारस नोंद करणेबाबतची प्रक्रिया मयत सभासदांचे वारसांनी वि का सेवा सहकारी संस्था पातळीवर पुर्ण करुन घेण्याची सुचना शासन व बँक पातळीवर देण्यात आलेल्या असुन मयतांचे वारस सभासदांनी याबाबत विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमध्ये योग्य त्या कागदपत्रासह त्वरीत संपर्क करुन मयतांचे कर्जखात्यास वारस नेमणुकीची कार्यवाही करुन घेण्याचे अवाहन रावसाहेब वर्पे यांनी केले.



महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत राज्यामध्ये अहिल्यानगर जिल्हयातील शेतकरी सभासदांचे कर्ज माहिती अपलोड करणे, आधारप्रमाणीकरण करुन घेणे व शासनाकडुन प्राप्त झालेल्या रकमा शेतकरी सभासदांचे खात्यावर वेळेत जमा करणे मोठे व अवाहनात्मक काम जिल्हयातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे सचिव व त्यांची यंत्रणा तसेच बँक कर्मचारी यांनी अतिशय कष्ट घेऊन वेळेत पुर्ण केले. यासाठी जिल्हयातील सर्व तालुका सहनिबंधक सहकारी संस्था व सर्व शासकीय लेखापरिक्षक यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्यामुळे आज जिल्हयातील मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ झालेला असुन राज्यात अहिल्यानगर जिल्हा बँकेचे कामकाज अव्वल स्वरुपाचे झालेची दखल शासन पातळीवर घेण्यात आलेली आहे. यामुळे जिल्हयातील सचिव व त्यांची यत्रंणा आणि बँक कर्मचारी तसेच जिल्हयातील सर्व तालुका सहनिबंधक सहकारी संस्था व सर्व शासकीय लेखापरिक्षक यांचे विशेष आभार बँकेचे प्रशासक श्रीमती डोंगरे, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, जिल्हा विशेष लेखापरिक्षक गौतम निकाळजे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे यांनी मानले.

याकामी सहकार खाते यांचे अधिकारी, जिल्हा लेखापरिक्षक कार्यालय तसेच जिल्हा बँकेचे सरव्यवस्थापक, व्यवस्थापक व वरिष्ठ अधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

आमचा प्यारा तिरंगा तू....!

वाऱ्यावर डौल तू , आनंदानें बहर तू ,
महासागरा परी, पृथ्वीवर लहर तू ,

उंच शिखरावर दिसणारी,
भारताची शान तू....
मान आमचा आणि
सन्मानही आमचा तू ,

तुझ्या कुशीत जन्म आमचा,
ओळख आमची तू ,
तूच आमचा त्राता आणि
दाताही तूच तू ,

तुच आमची माता,
भाग्यविधाताही तू....
त्यागाची शिकवण तू
आणि शांतीची मूर्ती तू ,

समृद्धीच्या शिखरावर,
बहरलेली वेल तू ,
पितृत्वाचा आदर तू आणि
मातृत्वाचा पाझर तू ,

अतिथींचें स्वागत आणि
संस्कृतीचा सागर तू.
न्यायाची शक्ती तू
आणि
ध्येयाची स्फूर्ती तू ,



भगवंताची भक्ती तू,
एकात्मतेची मूर्ती तू....
दुष्टांचा संहार तू आणि दुर्जनांवर प्रहार तू ,
आदराने मान झुकावी आमची
असा आमचा प्यारा तिरंगा तू....!

ज्योती रावराणे,
कांजूरमार्ग, मुंबई

महावितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात नवलेवाडी व माळीझाप गावचे शेतकरी करणार आमरण उपोषण

अकोले (समर्थ गांवकरी)

एका सीएनजी पेट्रोल पंप चालकाला उच्च दाब लाईनचे कनेक्शन देण्यासाठी महावितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी अर्थपूर्ण व्यवहार करून आमचा विरोध असताना हे काम मनमानी पद्धतीने पूर्ण केले. हे पोल तत्काळ काढून घ्यावेत नाही तर याला विरोध म्हणून आम्ही नवलेवाडी व माळीझाप गावचे शेतकरी आमरण उपोषण करणार आहेत.

याबाबत पद्माकर वाळूंज, सुधीर झोळेकर यांनी सांगितले कि महावितरण सार्वजनिक बांधकाम विभाग पोलीस प्रशासन यांच्या विरोधात औरंगपूर, नवलेवाडी व माळीझाप गावच्या नागरिकांनी २२/०१/२०२६ रोजी उपोषण सुरू केले होते. शुक्रवार दि. २३/०१/२०२६ रोजी उपोषण स्थळी वीज वितरण कंपनीचे उप–कार्यकारी अभियंता, अकोले–उपविभाग वरिष्ठ अधिकारी शेळके साहेब व संगमनेर येथील वरिष्ठ अभियंता कुमावत साहेब हे चर्चा करून गेले होते.

उपोषण सोडण्यासाठी आम्हाला वीज वितरण कंपनीने पत्र दिले त्या पत्रात औरंगपूर, नवलेवाडी व माळीझाप या गावातील शेतकऱ्यांचा सदर नवीन विजवाहिनी जाण्यासाठी विरोध होत असल्याने सदर काम दोन्ही गटांमधील वाद मिटत नाही तोपर्यंत सध्याच्या स्थितीत परिस्थितीत ठेवण्यात आले आहे, असा उल्लेख केला असताना देखील तरी संबंधित उद्योजकाने प्रशासकीय अधिकाऱ्यांचा व पोलीस बळाचा वापर करून ही उच्च दाब लाईन रोडच्या खालच्या बाजूने नवलेवाडी व माळीझाप भागात काम पूर्ण केलेले आहे. म्हणजेच महावितरण ने तहसीलदार यांना लेखी पत्र दिले, त्याद्वारे काम बंद चे आश्वासन दिलेले असताना देखील महावितरण ने मूठमाती देत काम पूर्ण केले. यामुळे भविष्यात जीवित हानी होऊ शकते, असे आम्ही निवेदनात म्हटले होते. त्याचा लगेचच अनुभव देखील आला. या कामामुळे महावितरणच्या पोल मध्ये अडकवलेल्या महा नेटच्या केबलमुळे ट्रॅक्टर व दुचाकी अपघातात दुचाकी वरील दोघांना आपला जीव देखील गमवावा लागला. याचा तरी शासनाने विचार करावा.

महावितरण च्या प्लॅन इस्टिमेट प्रमाणे ही लाईन रोडच्या वरच्या बाजूने आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दहिफळे साहेब व पाचोडकर साहेब यांनी प्रत्यक्ष येऊन पोलची पाहणी केली हे पोल डांबरी रस्त्या लागत २ ते ४ फुट अंतरावर आहे व हे पोल अत्यंत धोकादायक असल्याचे त्यांच्या दर्शनास आले, हे धोकादायक पोल तत्काळ काढून घेण्यात यावे असे पत्र संबंधित पेट्रोल पंप चालकास व महावितरण कार्यालयास दिलेले आहे. याकडे दुर्लक्ष करूनही दि. ०८/०६/२०२६ रोजी उर्वरित पोल चे काम करून लाईन जोडून घेतली आहे, यावेळी रोड च्या बाजूचे झाडे मुळा सहित तोडून उर्वरित पोल चे काम करून लाईन जोडून घेतली आहे. यांनी तत्काळ हे पोल काढून घ्यावेत नाहीतर आम्हा सर्व शेतकरी मिळून महावितरणच्या विरोधात आमरण उपोषण ला बसू. या प्रकरणी महावितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करा हि आमची प्रमुख मागणी राहील.

लखनौच्या भूमीत महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचा भव्य आविष्कार

'नमन व दिंडी नृत्या'तून महाराष्ट्राची भक्तीपरंपरा, लोककला आणि सांस्कृतिक वैभवाचे सादरीकरण

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यावतीने उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ येथे आयोजित विशेष सांस्कृतिक कार्यक्रम ात महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविण्यात येणार आहे. महाराष्ट्राची भक्तीपरंपरा, लोककला, लोकसंस्कृती, सण–उत्सव आणि ऐतिहासिक वैभव यांचा कलात्मक आविष्कार 'नमन व दिंडी नृत्य' या विशेष सादरीकरणातून करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा देशाच्या विविध भागांत परिचय करून देण्याच्या उद्देशाने म हाराष्ट्रातील कलाकारांचे विशेष पथक लखनौ येथे दाखल झाले आहे. हे सांस्कृतिक सादरीकरण सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री ड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात येणार आहे.

'नमन व दिंडी नृत्य' या सादरीकरणाची सुरुवात गणेशवंदना असलेल्या 'नमन' या पारंपरिक कलाप्रकाराने होणार आहे.

जिल्ह्यातील पतसंस्थांचे व अडचणी सोडवण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात कार्यशाळांचे आयोजन होणे गरजेचे : विभागीय अध्यक्ष. वसंत लोढा

जामखेड (समर्थ गांवकरी)

जामखेड येथे पत संस्था चे चेअरमन. संचालक. व्यवस्थापक. अधिकारी. वसुली अधिकारी. कर्मचारी यांच्या साठी एक दिवसीय कार्य शाळा आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी लोढा आपले मनोगत व्यक्त करत होते.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सभापती. विधान परिषद. प्रा. राम शिंदे साहेब उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे हे पतसंस्थाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मात्र त्यांच्यापुढे आपले प्रश्न मांडण्यासाठी लवकरच

जिल्हातील पतसंस्थाचे अधिवेशन घेण्यात येणार आहे. असे मत पतसंस्था फेडरेशनचे नाशिक विभागीय अध्यक्ष वसंत लोढा यांनी व्यक्त केले.

काल दि. १३ रोजी जामखेड येथे नाशिक विभागातील नागरी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे फेडरेशन व राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व कर्जत–जामखेड तालुका पतसंस्था फ डरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पतसंस्थांचे चेअरमन, संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नाशिक विभागीय अध्यक्ष वसंत लोढा, कृषी उत्पन्न बाजार समि तीचे सभापती शरद कार्ले, तालुकाध्यक्ष आजिनाथ हजारे, रेणुका माता मल्टीस्टेटचे चेअरमन व अर्थतज्ञ प्रशांत भालेराव, सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, जामखेडचे उपनिबंधक दिलीप तिजोरे, कर्जतचे उपनिबंधक टेकाळे, यशवंत नागरी पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र कोठारी, मराठा सेवा पतसंस्थेचे उपाध्यक्ष उदय अनभुले सहनिबंधक तान्हाजी कवडे प्रशांत खोपटीकर आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना लोढा यांनी सांगितले की, आपल्या जिल्हातील पतसंस्था चळवळ राज्यात चांगली आहे. परंतु काही पतसंस्था अडचणीत असल्याने त्याचा इतर पतसंस्थाना त्रास होत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजना आहेत. त्या माध्यमातून सर्वच पतसंस्थांना मार्गदर्शन व सहकार्य मिळावे यासाठी जिल्हाभर कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत. शासनाने अनेक नवीन नियम लागू होत आहे. यामध्ये बँकेत जो दहा वर्षे संचालक राहतो त्याला पुन्हा संचालक होता येत नाही. तोच नियम पतसंस्थेला लागु शकतो. अशा वेळी ज्यांच्या भरवशावर पतसंस्था उभी आहे तोच नसेल तर ठेवीदारांनी कोणाला जबाबदार धरायचे. त्यामुळे असे जर नियम लागू झाले तर खूप वेगळी परिस्थिती निम ण होणार आहे. केंद्र सरकार पतसंस्थाना व्यवसाय करण्यासाठी परवानगी देणार आहे. तसेच पतसंस्थाना नफ्यातील काही भाग संचालकांना मिळणार आहे यासह अनेक बदल होणार आहेत. याची माहिती होण्यासाठी कार्यशाळांची गरज आहे.

परंतु कर्जत जामखेड येथील कार्यशाळांना प्रतिसाद कमी दिसत आहे. पतसंस्था चळवळ निकोप टिकावी यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. भविष्यात होणाऱ्या प्रशिक्षणासाठी पदाधिकारी यांनी उपस्थित राहिले पाहिजे. भविष्यात पतसंस्थावर मोठ्या जबाबदारी येणार आहेत त्यामुळे सहकार खात्याच्या भार कमी होण्यास मदत होणार आहे. फेडरेशन पतसंस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे असे आश्वासन लोढा यांनी दिले आहे.

यावेळी बोलताना तिजोरे यांनी सांगितले की, संपर्कातून प्रश्न सुटतात, चांगल्या कामाला प्रतिसाद मिळतो. उपनिबंधक व पतसंस्था यांच्यातील दुवा फेडरेशन आहे. ज्याला कुणाचा आधार त्यांना पतसंस्था आधार आहेत. सभासदांना आर्थिक पत मिळवून देण्याचे काम पतसंस्था करते. आपल्या पेक्षा कोणाचीही के वाय सी चांगली नाही. त्यामुळे चांगल्या गोष्टींची स्पर्धा करू असे आवाहन केले.



यावेळी कर्जत व जामखेड मधील उत्कृष्ट पतसंस्थाचे गौरव करण्यात आले. यामध्ये ज्योती क्रांती, यशवंत नागरी, राजश्री शाहू, भैरवनाथ पतसंस्था हाळगाव, धनसारथी पतसंस्था खर्डा, आणखेरीदेवी महिला पतसंस्था फक्राबाद नंदादेवी पतसंस्था नान्नज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी पतसंस्था पिंपरखेड, वृषाली जंजीरे पतसंस्था परिटवाडी, रावसाहेब देशमुख पतसंस्था राशिन यांचा फेडरेशन च्या वतीने गौरव करण्यात आला आहे.

यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन, प्रस्ताविक व आभार आजिनाथ हजारे यांनी मानले आहे

थोडक्यात पण महत्वाचे

उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांचे पद रद्द ,६ वर्षे निवडणूक लढवण्यास बंदी

कोपरगाव (समर्थ गांवकरी) : पालिकेच्या राजकारणात सत्ताधारी कोल्हे गटाला जबरदस्त हादरा बसला. या गटाचे उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले. त्यामुळे जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी त्यांचे नगरसेवकपद रद्द ठरवीले. तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयानुसार रणशूर यांच्यावर पुढील सहा वर्षे निवडणूक लढविण्यासही बंदी घालण्यात आली. अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते सागर आहेर यांच्या वतीने ॲड. मुन्ना सय्यद यांनी पत्रकार परिषदेत दिली.



पालिका निवडणुकीला एक वर्ष पूर्ण व्हायच्या आतच काळे गटाकडून कोल्हे गटाला हा मोठा धक्का देण्यात आला. पालिका निवडणुकीत रणशूर यांनी प्रभाग क्रमांक ९ 'अ' मधील अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव जागेवरून निवडणूक लढविली होती. यावेळी त्यांनी एस.सी.-३७ प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र सादर केले होते. या प्रमाणपत्राच्या वैधतेवर सागर आहेर यांनी आक्षेप घेतला होता. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे तक्रार दाखल केली होती. समितीने संबंधित कागदपत्रांची चौकशी व छाननी केली. त्यामध्ये रणशूर यांनी सादर केलेले जात प्रमाणपत्र अवैध ठरवीले. जात प्रमाणपत्र रद्द झाल्यानंतर सागर आहेर यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे अर्ज करून उपनगराध्यक्ष रणशूर यांना नगरसेवकपदावरून अपात्र ठरविण्याची मागणी केली होती.

या अर्जाची सुनावणी करतांना जिल्हाधिकाऱ्यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा अहवाल तसेच संबंधित कायदेशीर बाबींची दखल घेत उपनगराध्यक्ष रणशूर यांना नगरसेवकपदावर राहण्यास अपात्र ठरविले. त्यामुळे त्यांचे नगरसेवकपद रद्द झाले आहे.

कोतूळच्या देवी गल्लीतील ड्रेनेजवरील लोखंडी जाळी धोकादायक; अपघाताची शक्यता

कोतूळ (समर्थ गांवकरी) : अकोले तालुक्यातील कोतूळ येथील देवी गल्लीमध्ये श्री. भाऊसाहेब हांडे यांच्या घरासमोरील अंडरग्राउंड ड्रेनेज लाईनवरील लोखंडी जाळी मोठ्या प्रमाणात तुटून धोकादायक अवस्थेत आली आहे. जाळीला मोठे भगदाड पडल्याने या ठिकाणी कधीही गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



या ठिकाणी रस्ता काँक्रिटीकरण केल्यानंतर रस्त्याच्या मध्यभागातून अंडरग्राउंड गटार टाकण्यात आले. मात्र, त्यावर बसविण्यात आलेली लोखंडी जाळी निकृष्ट दर्जाची असल्याने ती गंजून व तुटून खराब झाली आहे. परिणामी जाळीमध्ये मोठे भगदाड पडले असून खाली सुमारे चार फूट खोल खड्डा असल्याने पादचारी, लहान मुले, दुचाकीस्वार किंवा वृद्ध व्यक्ती यांचा तोल जाऊन ते थेट खड्ड्यात पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

देवी गल्लीत नागरिकांची सतत ये-जा असल्यामुळे हा प्रकार अत्यंत धोकादायक ठरत आहे. स्थानिक नागरिकांनी संबंधित ग्रामपंचायत व प्रशासनाने या धोकादायक जाळीची तातडीने दुरुस्ती करून मजबूत व दर्जेदार लोखंडी जाळी बसवावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित यंत्रणेवर राहील, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

देशात पहिल्यांदाच जातआधारीत जनगणना, अधिसूचना जाहीर; ४० प्रश्नांची यादी जाहीर

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी) : देशातील आगामी जनगणनेसाठी केंद्र सरकारने ४० प्रश्नांची अधिकृत यादी जाहीर केली आहे. महत्वाचे म्हणजे, या जनगणनेदरम्यान पहिल्यांदाच जातीशी संबंधित माहितीही विचारली जाणार आहे. याशिवाय, कौटुंबिक माहिती, शिक्षण, रोजगार, एवढेच नाही तर कोविड लसीकरणाची माहितीही विचारली जाणार आहे. देशाचे रजिस्ट्रार जनरल मृत्युंजय कुमार नारायण यांच्या आदेशानुसार, जम्मू-कश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांतील बर्फाच्छादित भागांत १ ते ३० सप्टेंबर दरम्यान जनगणना प्रक्रिया पार पडेल. प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती गोळा करण्यापूर्वी नागरिकांसाठी १७ ते ३१ ऑगस्ट दरम्यान 'सेल्फ एन्यूमेरेशन' अर्थात स्वतःच माहिती भरण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. तसेच, देशाच्या उर्वरित भागांमध्ये पुढील वर्षी जनगणना सुरू होईल. जनगणनेत विचारल्या जाणाऱ्या ४० प्रश्नांमध्ये सर्वप्रथम व्यक्तीचे नाव, कुटुंब प्रमुखाशी असलेले नाते, लिंग, जन्मतारीख आणि वय, सद्य वैवाहिक स्थिती, विवाहाच्या वेळचे वय, पती किंवा पत्नीचे नाव, घोषित राष्ट्रीयत्व, धर्म, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा जात, वडिलांचा तपशील, आईचा तपशील आणि अपंगत्वाची (दिव्यांगत्वाची) माहिती विचारली जाईल.

हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत जामखेडमध्ये ७५ मीटर तिरंगा रॅली.. अभनव उपक्रम

जामखेड (समर्थ गांवकरी)

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय छात्र सेना (आर्मी), १७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अहिल्यानगर व सर्व प्रशासकीय विभागाच्या वतीने कर्नल निकेत नेगी यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य ७५ मीटर तिरंगा रॅलीचे आयोजन गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता करण्यात आले आहे.

या देशभक्तीपर रॅलीचा प्रारंभ तहसील कार्यालयाच्या पटांगणातून झाली. यावेळी प्रमुख उपस्थिती, नायब तहसीलदार प्रदीप पांडुळे,पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, मुख्याधिकारी अजय साळवे, हरिभाऊ बेलेकर, मंडळ अधिकारी आय एन काळे, सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, प्राचार्य बाळासाहेब पारखे,प्राचार्य बी के मडके,प्राचार्य डॉ कॅप्टन गौतम केळकर,उपमुख्याधपक सेकंड ऑफिसर अनिल देडे, उपप्राचार्य युवराज भोसले पर्यवेक्षक सुदाम वराट, एनसीसी ऑफिसर मयूर भोसले, मोहन यादव, सुग्रीव ठाकरे माजी सैनिक संघटना अध्यक्ष बजरंग डोके, शिवनेरी अकॅडमी संचालक नि कॅप्टन लक्ष्मण भोरे,प्रा आण्णा मोहिते,नानासाहेब बाबर, पोलीस कॉन्स्टेबल प्रकाश जाधव,आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रशासकीय विभागातील अधिकारी, जामखेड महाविद्याल, ल ना होशिंग विद्यालय व रयतचे श्री नागेश विद्यालय जामखेडचे एनसीसी कॅडेट, कन्या विद्यालय शिक्षक, महिला,शहरातील ग्रामस्थ आजी माजी सैनिक, उपस्थित होते.

यावेळी नायब तहसीलदार पांडुळे व पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी हर घर तिरंगा रॅली ला शुभेच्छा देऊन या उपक्रम चे अभिनंदन केले.

रॅलीमध्ये ७५ मीटर लांबीचा तिरंगा घेऊन विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

यावेळी विविध ठिकाणी पुष्प टाकून तिरंगा रॅलीचे ग्रामस्थांनी विशेष स्वागत केले.

यावेळी हर घर तिरंगा,भारत माता की जय, हमारी जान तिरंगा, वंदे मातरम, अशा घोषनेने संपूर्ण परिसर दुमदुमून निघाला.

रॅलीचा मार्ग तहसील कार्यालय पटांगण - बीड रोड - जय हिंद चौक - छत्रपती शिवाजी महाराज पेठ - संविधान स्तंभ - खर्डा चौक - तपनेश्वर रोड - बीड रोड - तहसील कार्यालय - जामखेड महाविद्यालय, जामखेड असा होता.



शहीद जवान गणेश भोसले प्रतिष्ठानच्या वतीने तिरंगा ध्वज उपलब्ध करून देण्यात आला.

देशाच्या स्वातंत्र्याचा अभिमान, राष्ट्रध्वजाविषयी आदर आणि देशभक्तीची भावना जनमानसात अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रास्ताविक कॅप्टन गौतम केळकर, सूत्रसंचलन सेकंड ऑफिसर अनिल देडे तर आभार प्रदर्शन सेकंड ऑफिसर मयूर भोसले यांनी केले.

कोंबिंग ऑपरेशनमध्ये कोपरगाव पोलिसांची धडक कारवाई

फरार आरोपींसह अवैध धंद्यांवर कारवाई

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

कोपरगाव तालुका पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन राबवून सराईत गुन्हेगार, अनेक वर्षांपासून फरार असलेले आरोपी, अवैध दारू विक्रेते तसेच जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई केली. या कारवाईत तलवारीसह एका सराईत आरोपीला अटक करण्यात आली असून तीन फरार आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच अवैध दारू व जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या आदेशानुसार, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती व पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी व पथकाने ही कारवाई केली.

या कारवाईदरम्यान सन २०२० मधील चोरीच्या गुन्ह्यात फरार असलेला कपिल राजू पिंपळे हा सुरेगाव येथे नागरिकांना तलवारीचा धाक दाखवत असताना पोलिसांच्या हाती लागला. पोलिसांनी त्याला तलवारीसह ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम १९६० कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल केला.

तसेच राहुरी पोलीस ठाण्यात सन २०२० मध्ये दाखल असलेल्या भारतीय दंड संहिता कलम ४२० मधील फसवणुकीच्या गुन्ह्यात फरार असलेला कान्हेगाव येथील रविंद्र रंगनाथ बर्डे याला ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी राहुरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. नेवासा पोलीस ठाण्यात सन २०१२ मध्ये दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यात फरार असलेला पोहेगाव येथील सतीश बाबासाहेब अनाप यालाही ताब्यात घेऊन नेवासा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

दरम्यान, धारणगाव, वारी, सुरेगाव व देर्डे-चांदवड आदी गावांमध्ये अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर छापे टाकून ५ हजार ४४० रुपये किमतीची देशी व विदेशी दारू जप्त करण्यात आली.

संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले. चांदेकसारे येथे अवैध जुगार अड्ड्यावर छापा टाकून ३ हजार १४० रुपये रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले असून महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

याशिवाय न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या आरोपी व साक्षीदारांविरुद्ध न्यायालयाने काढलेल्या १९ वॉरंटची बजावणी करण्यात आली असून ३७ जणांना समन्स बजावण्यात आले.

धीरज परदेशी मृत्यू प्रकरण;पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर आमदार संग्राम जगतापांच्या आरोपानी खळबळ

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

धीरज परदेशीवरील हल्ल्याच्या घटनेनंतर अहिल्यानगरमध्ये तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. धीरज परदेशी याची हत्या टिळा लावल्यामुळे झाल्याचा आरोप भाजपं आमदार संग्राम जगताप यांनी केला. आज त्यांनी या संदर्भात पत्रकार परिषद घेऊन काही मागण्या केल्या.

या घटनेसंदर्भात कागदपत्र तयार होण्याआधीपासून चांगला सरकारी वकिल पाहिजे. ही घटना वेगळ्या दिशेने नेण्याचा पोलीस प्रयत्न करतायत.पत्रकार परिषदेच्या माध्यमातून शासनाकडे मागणी करणार आहोत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार आहोत.आमच्या मागण्या मांडणार आहोत. मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांशी संवाद साधला. त्यांच्या भावना जाणून घेतल्या असं संग्राम जगताप म्हणाले.

त्याच्यानंतर कालपासून वेगवेगळ्या घटना घडत आहेत. आंदोलन अंत्यविधी झाल्यानंतर पोलिसांनी पुन्हा एकदा भूमिका बदलण्याचं



काम केलं. म्हणून आज आम्हाला पत्रकार परिषद घ्यावी लागली असं जगताप म्हणाले.

आमची जी मागणी होती त्यांची जी अनधिकृत घर आहेत त्यांना शासनाने नोटीस लावली. पण त्यांनी हायकोर्टात जाऊन स्टे मिळवला. यामागचे जे मास्टरमाइंड आहेत ते वेगळे आहेत. पोलीस कानाडोळा करतायत. दुर्लक्ष करतायाय. त्यामुळे या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे ही आमची मागणी आहे. धीरज परदेशी यांच्या पत्नीला शासनाच्या माध्यमातून नोकरी मिळाली पाहिजे. आमच्या हिंदुत्ववादी संघटनांकडून मदत दिली जाईल. पण सन्मानजनक नोकरी मिळाली पाहिजे अशी मागणी संग्राम जगताप यांनी केली.

शिक्षकांनी सेवानिवृत्तीनंतरही रयतची सेवा करावी : बाबासाहेब भोस!

कर्जत (समर्थ गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा गांधी विद्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या पाच शिक्षकांचा सेवापूर्ती सोहळा शारदाताई पवार सभागृहात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना बाबासाहेब भोस यांनी, रयत संस्थेचे सेवक व कर्मचारी यांनी सेवेतून निवृत्त न होता आयुष्यभर रयतेची सेवा करावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी विद्यालयात प्रदीर्घ काळ ज्ञानदानाचे कार्य करणारे शिक्षक वाल्मीक सोनवणे, राजकुमार चौरे, बबन सोनवणे, अरुणकुमार पिंपळे आणि झुंबर जावळे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते त्यांना भारतीय संविधानाची प्रत, महात्मा फुले दिनदर्शिका व पूर्ण पोशाख देऊन गौरविण्यात आले. साहित्यिक व पत्रकार पोपटराव सोनवणे यांनी आपल्या मनोगतात कर्मवीर भाऊराव पाटील, राष्ट्रसंत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण व समाजसेवेच्या कार्याचा गौरव केला. तसेच



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या वंचित व बहुजन समाजाच्या शिक्षण कार्याला दिलेल्या सहकार्याचा उल्लेख केला. सोनवणे परिवाराच्या वतीने सर्व सत्कारमूर्तींना भारतीय संविधानाची प्रत व महात्मा फुले दिनदर्शिका भेट देण्यात आली.

कार्यक्रमास विविध मान्यवरांनी उपस्थित राहून सेवानिवृत्त शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शालेय समिती, माजी विद्यार्थी समिती, मुख्याध्यापक संघ, हिंदी, इंग्रजी व कला शिक्षक संघटना तसेच विविध सामाजिक संघटनांनी सहकार्य केले. महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्षपदी दिनार कुदळे

कोपरगांव (समर्थ गांवकरी)

तालुक्याची कामधेनु असलेल्या कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्षपदी दिनार कुदळे यांची संचालक मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते निवड करण्यात आली. निवडीनंतर कारखान्याचे मार्गदर्शक व माजी आमदार अशोक काळे आणि आमदार आशुतोष काळे यांनी त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रादेशिक उपसंचालक संजय गोंदे यांनी काम पाहिले.सत्काराला उत्तर देताना कुदळे म्हणाले, तालुक्याचे सक्षम नेतृत्व अशी ओळख असलेल्या आमदार आशुतोष काळे यांनी माझ्यावर मोठी जबाबदारी सोपवीली. अशा सक्षम नेतृत्वासमवेत काम करण्याची संधी मिळणे हा माझा सन्मान आहे. सर्वांना सोबत घेऊन जबाबदारी पार पाडू. कर्मवीर शंकरराव काळे आणि माजी आमदार अशोक काळे यांच्या नेतृत्वाचा वारसा या कारखान्याला लाभला आहे. संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत उपाध्यक्षपदासाठी कुदळे यांच्या नावाची सुचना सुनील मांजरे यांनी मांडली,राजेंद्र



घुमरे यांनी अनुमोदन दिले.

यावेळी बोलतांना मावळते उपाध्यक्ष प्रवीण शिंदे यांनी कुदळे यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी संचालक सुधाकर रोहोम, सूर्यभान कोळपे, राजेंद्र घुमरे, दिलीपराव बोरनारे, डॉ.मच्छिंद्र बर्डे, सचिन चांदगुडे, ड. राहुल रोहमारे, अनिल कदम, वसंतराव आभाळे, श्रीराम राजेभोसले, अशोकराव मवाळ, सुनील मांजरे, मनोज जगझाप, शंकरराव चव्हाण,सौ.इंदूबाई शिंदे, सौ.वत्सलाबाई जाधव, प्रशांत घुले, गंगाधर औताडे, श्रावण आसने, कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनील कोल्हे, आसवणी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबा सय्यद, असि. सेक्रेटरी संदीप शिरसाठ व पदाधिकारी उपस्थित होते.

आदिवासी तरुणांनी तीन त कार अंगीकार करावा : रविंद्र भोर

मांडवी उगम खोऱ्यात जागतिक आदिवासीदिन उत्साहात साजरा

जुन्नर (समर्थ गांवकरी)

आजच्या आदिवासी भागातील तरुणांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी तीन त कार म्हणजेच तेजस्विता, तपास्वीता आणि तत्परता या तीन गुणांचा आपल्यात अंगीकार करावा असे ज्येष्ठ पत्रकार आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र भोर यांनी तरुण पिढीला मार्गदर्शन करताना शिक्षण,सामाजिक बांधिलकी आणि संघटनात्मक कार्याची गरज व्यक्त केली. याशिवाय मोबाईल,मद्यपान यासारख्या व्यसनांपासून दूर रहावे असे सांगितले.यावेळी अशोक ठोगिरे,जिल्हा परिषद सदस्या सोनाबाई दाभाडे,पी. एस.कवटे,चंद्रकांत लोहोकरे, सखाराम पिचड,संदीप शिंगोटे

राजेंद्र दाभाडे,भीमराव मुठे, ठमा कवटे,फसाबाई कवटे, हौसाबाई काठे,जयश्री मुठे याशिवाय मांडवी नदी उगम खोरे संघर्ष समितीचे सर्व तरुण कार्यकर्ते,ग्रामस्थ मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

मांडवी नदीच्या उगम खोऱ्यातील मुथाळणे,मांडवे पुताचीवाडी,जोशीवाडी,आणि जांभुळशी -कोपरे परिसरात ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. निसर्गरम्य परिसर, पावसाच्या हलक्या ते जोरदार सरी व आदिवासी पारंपरिक कला-संस्कृतीच्या सादरीकर यामुळे संपूर्ण परिसरात अति उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.या निमित्ताने आदिवासी समाजाचीअस्मिता संस्कृती,परंपरा व एकजुटीचा जागर करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात मुथाळणे घाटमाथ्यावर असले ल्या वाघोबाच्या शिल्पाचे पूजन करून झाली.यावेळी परिसरातील समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले. यावेळी निसर्गदेवतेचे पूजन करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.त्यानंतर प्रतिनिधिक स्वरूपात वृक्षा रोपण करण्यात आले.पुणे जिल्हा परिषद सदस्या सोनाबाई दाभाडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

त्यानंतर मुथाळणे घाटातून भव्य रॅली काढण्यात आली. आदिवासी पारंपरिक गीतांच्या तसेच डीजेच्या तालावर तरुणाईने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला रॅली दरम्यान मुथाळणे,मांडवे,पुताचीवाडी,

जांभुळशी- कोपरे येथे विविध महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.कोपरे येथे महिला,तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांनी आदिवासी लोक गीतांवर पारंपरिक नृत्य सादर करत सांस्कृतिक कार्यक्रमात रंगत आणली.पारंपरिक वेशभूषा व लोककलेच्या सादरी करणामुळे



आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडले.यानंतर कोपरे येथे मंगल कार्यालयात मुख्य कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी तहसीलदार ठाणे येथील प्रदीप कुडळ होते.जिल्हा परिषद शाळा कोपरे येथील विद्यार्थ्यांनी आकर्षक आदिवासी नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुनाजी लक्ष्मण मुठे यांनी केले.सखाराम पिचड यांनी आदिवासी समाजाच्या प्रगती साठी एकजुटीचे महत्त्व अधोरेखित केले. ज्येष्ठ आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक धर्मा दिघे यांनी मार्गदर्शन करत शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि संघटनात्मक कार्याची गरज व्यक्त केली. काशिनाथ माळवे यांनी मांडवी उगम खोऱ्यातील विविध स्थानिक प्रश्नांकडे लक्ष वेधले. जिल्हा परिषद माजी सदस्य अंकुश आमले यांनी शुभेच्छा दिल्या.सूत्रसंचालन शंकर माळी व संजय कुडळ यांनी केले. राजू मुठे यांनी आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

थोडक्यात पण महत्त्वाचे

राज्याच्या शिष्यवृत्ती परीक्षेत पिंपरी गवळीचा यशवर्धन राज्यात प्रथम!

पारनेर (समर्थ गांवकरी) : शुक्रवार दि. १४ ऑगस्ट २०२६ पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या गुणवत्तेने पुन्हा एकदा संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे. तळेगाव ढमढेरे, ता. मावळ येथील कुमार जयसिंगराव ढमढेरे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा इयत्ता चौथीतील विद्यार्थी यशवर्धन दत्तात्रय थोरात याने प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत तब्बल ३०० पैकी २९६ गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक पटकावून पारनेरच्या शैक्षणिक क्षेत्राचा लौकिक उंचावला आहे.



यशवर्धनच्या या उल्लेखनीय यशामागे पारनेर तालुक्यातील पळसपूर गावच्या मार्गदर्शक शिक्षिका सौ. जयश्री इघे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि जिद्दीची कोणतीही कमतरता नाही, हे यशवर्धनने आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण अभ्यास, पालकांचे प्रोत्साहन आणि विद्यार्थ्याची मेहनत यांचा सुरेख संगम झाला की ग्रामीण भागातील विद्यार्थीही राज्याच्या पातळीवर सर्वोच्च स्थान मिळवू शकतो, याचे हे प्रेरणादायी उदाहरण आहे.

स्वातंत्र्यदिनी आरोग्यमंत्री आबिटकरांचा गावागावातील आरोग्य समित्यांच्या सदस्यांशी थेट ऑनलाइन जनसंवाद

मुंबई (समर्थ गांवकरी) : गावपातळीवरील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, लोकाभिमुख आणि प्रभावी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्यभरातील विविध आरोग्य समित्यांच्या अशासकीय सदस्यांशी थेट ऑनलाइन जनसंवाद साधणार आहेत. या माध्यम ातून आरोग्य व्यवस्थेमध्ये लोकसहभाग वाढविण्यावर भर राहणार असून राज्यातील १२४ आरोग्य संस्थांचे ऑनलाईन उद्घाटनही आरोग्यमंत्री करणार आहेत.



१५ ऑगस्ट रोजी दुपारी १.३० वाजता होणाऱ्या या जनसंवादातून गावागावातील आरोग्यविषयक प्रश्न, सूचना आणि अपेक्षा थेट आरोग्यमंत्री यांच्यापर्यंत पोहोचणार असून त्याचवेळी राज्यातील विविध नवीन आरोग्य संस्थांचे ऑनलाइन उद्घाटनही करण्यात येणार आहे. निरोगी महाराष्ट्रासाठी शासन, आरोग्य यंत्रणा आणि समाज यांची भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी होणारा जनसंवाद आरोग्य क्षेत्रातील लोकसहभागाला नवी दिशा देणारा ठरणार आहे. आरोग्य सेवांची गुणवत्ता, विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, नागरिकांचा आरोग्य व्यवस्थेतील सहभाग आणि स्थानिक पातळीवरील आरोग्यविषयक अडचणी याबाबत या जनसंवादातून थेट चर्चा होणार आहे. निवडक पाच समिती सदस्यांना आपले मनोगत मांडण्याची संधी मिळणार असून, त्यानंतर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर मार्गदर्शन करणार आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या ग्राम आरोग्य, स्वच्छता व पोषण समिती, जन आरोग्य समिती, रुग्ण कल्याण समिती आणि एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती या समित्या शासन आणि नागरिक यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. या समित्यांमध्ये आरोग्य यंत्रणांसोबत ग्राम पंचायत प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी, युवक, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध घटकांचा सहभाग असतो.

मृद व जलसंवर्धनासाठी 'रिल फॉर सॉईल एड वॉटर कन्झर्वेशन' स्पर्धेत युवकांनी सहभाग घ्यावा : मंत्री संजय राठोड

मुंबई (समर्थ गांवकरी) : मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने १५ ते २१ ऑगस्ट २०२६ या जलसंधारण सप्ताह दरम्यान राज्यातील सर्व जिल्ह्यात मृद व जलसंवर्धन 'रील्स स्पर्धेचे 'आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींच्या कल्पकतेचा उपयोग करुन इन्स्ट्राग्राम च्या माध्यमातून म हाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी राज्यव्यापी रिल फॉर सॉईल एड वॉटर कन्झर्वेशन' स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या रिल स्पर्धेत राज्यातील युवक – युवतींनी उत्सफूर्त सहभागी घ्यावा, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले आहे.



मंत्री संजय राठोड म्हणाले, माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंती निमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यभर जलसंधारण दिन साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने राज्यव्यापी 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर, जलसंधारणाची शपथ असे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. जलसंधारण सप्ताह दरम्यान राज्यातील सर्व जिल्ह्यात मृद व जलसंवर्धन रिल्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

रिल स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचा पात्र वयोगट १५ ते ३० वर्षे असा ठेवण्यात आला आहे. प्रत्येक स्पर्धकाने ३० ते ६० सेकंदांची इन्स्ट्राग्राम रील तयार करावी.

अहिल्यानगर-शिर्डी-मनमाड महामार्गाला 'नितीन गडकरी अनागोंदी नॅशनल हायवे' प्रतीकात्मक नामकरणाचा इशारा!

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

- २८ ऑगस्टला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन
- दहा वर्षांच्या रखडपट्टीचा जाब विचारणार; खर्च, कंत्राटदार आणि विलंबाची जबाबदारी जाहीर करण्याची मागणी

अहिल्यानगर-शिर्डी-मनमाड राष्ट्रीय महामार्गाच्या गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या रखडपट्टीचा, अपूर्ण कामांचा, वारंवार होणाऱ्या दुरुस्तीचा तसेच कंत्राटदार बदलण्याच्या प्रकारांचा निषेध करण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनादरम्यान महामार्गाचे प्रतीकात्मक नामकरण 'नितीन गडकरी अनागोंदी नॅशनल हायवे' असे करण्यात येणार असल्याची घोषणा संघटनांनी केली आहे.

अहिल्यानगर, शिर्डी आणि मनमाड या महत्त्वाच्या शहरांना जोडणारा हा महामार्ग उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा तसेच शिर्डीच्या धार्मिक, पर्यटन आणि आर्थिक क्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, अनेक वर्षांपासून महामार्गाच्या कामात होत असलेला विलंब, अपूर्ण राहिलेली कामे, वारंवार कराव्या लागणाऱ्या दुरुस्त्या आणि बदलले जाणारे कंत्राटदार यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ ड. कारभारी गवळी यांनी आंदोलनाची माहिती देताना महामार्गाच्या काम काजाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले. राष्ट्रीय महामार्गाची कामे वर्षानुवर्षे अपूर्ण राहणे, काही कंत्राटदारांकडून कामे अर्धवट सोडली जाणे, त्यानंतर पुन्हा निविदा काढणे, मुदतवाढ देणे आणि तरीही नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार रस्ता उपलब्ध न होणे हा केवळ तांत्रिक त्रुटींचा विषय म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही, असे त्यांनी म्हटले.

महामार्गाच्या कामांमध्ये आर्थिक हितसंबंध, कथित टक्केवारी, संगनमत किंवा भ्रष्टाचाराचा कोणताही प्रकार झाला आहे का, याची स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनांनी केली आहे. भ्रष्टाचारासंबंधी अंतिम निष्कर्ष सक्षम चौकशीअंतीच काढता येऊ शकतो; त्यामुळे केवळ आरोप-प्रत्यारोप करण्याऐवजी मागील सर्व व्यवहारांची वस्तुनिष्ठ तपासणी होणे आवश्यक असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाचे दीर्घकाळ नेतृत्व करणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या महामार्गाच्या कामाचा संपूर्ण सार्वजनिक हिशेब



जनतेसमोर मांडावा, अशी मागणी आंदोलनातून करण्यात येणार आहे. संबंधित अधिकारी व यंत्रणांची जबाबदारी निश्चित करावी तसेच कामात अपयशी ठरलेल्या किंवा काम सोडून गेलेल्या कंत्राटदारांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली, याची माहितीही सार्वजनिक करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, मागील दहा वर्षांतील महामार्गाशी संबंधित सर्व निविदा, प्रत्येक कंत्राटाची मूळ किंमत, सुधारित अंदाजपत्रके, देण्यात आलेल्या मुदतवाढी, कंत्राटदारांना करण्यात आलेली देयके, दंडात्मक कारवाई, काम सोडून गेलेले अथवा बदलण्यात आलेले कंत्राटदार, गुणवत्ता तपासणी अहवाल तसेच संबंधित अधिकारी व यंत्रणांची जबाबदारी याबाबतची संपूर्ण माहिती जनतेसमोर आणणे आवश्यक आहे.

अहिल्यानगर-शिर्डी-मनमाड महामार्गाचे स्वतंत्र तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय ऑडिट करण्यात यावे, अशी मागणीही आंदोलनात करण्यात येणार आहे. या तपासणीत गैरव्यवहार, निकृष्ट दर्जाचे काम अथवा सार्वजनिक निधीचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेने घेतली आहे.

ॲड. गवळी म्हणाले, राष्ट्रीय महामार्ग हा मंत्री, अधिकारी किंवा कंत्राटदारांची खासगी मालमत्ता नसून तो देशातील नागरिकांच्या करातून उभा राहतो. त्यामुळे प्रत्येक अपूर्ण किलोमीटरचा, प्रत्येक खड्ड्याचा, प्रत्येक वाढीव खर्चाचा आणि प्रत्येक वर्षाच्या विलंबाचा हिशेब जनतेला मिळालाच पाहिजे.

दि. २८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासम ोर होणाऱ्या आंदोलनातून संबंधित यंत्रणांना प्रामुख्याने तीन प्रश्न विचारण्यात येणार आहेत – हा महामार्ग पूर्ण नेमका कधी होणार? आतापर्यंत या कामावर किती सार्वजनिक पैसा खर्च झाला? आणि या प्रदीर्घ विलंबाला नेमके जबाबदार कोण? या प्रश्नांची स्पष्ट, लेखी आणि पुराव्यानिशी उत्तरे शासन, राष्ट्रीय महामार्ग प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी जनतेसमोर द्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. या आंदोलनाच्या यशस्वी आयोजनासाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ड. अमित थोरात, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, अशोक भोसले, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले, अमित थोरात आदी प्रयत्नशील आहेत.

कोहिनूर मंगल कार्यालयाजवळील अरुंद रस्ता आणि उघडा खड्डा ठरतोय जीवघेणा; स्कूल बसमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

कोहिनूर मंगल कार्यालयाजवळील रस्त्याच्या एका कोपऱ्यावर मोठे गटार असल्याने रस्ता अरुंद झाला असून, त्याच ठिकाणी असलेल्या उघड्या व धोकादायक भागामुळे अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. वाहनांना या ठिकाणी वळण घेण्यासाठी मोठा घेर घ्यावा लागतो. मात्र, रस्ता अरुंद असल्याने वाहनचालकांना आवश्यक तो घेर घेणे कठीण होत असून, वाहनांचे डाव्या बाजूचे चाक वारंवार या खड्ड्याकडे जाण्याची शक्यता निर्माण होते.

या ठिकाणी नुकतीच कार उलटल्याची घटना घडल्याने या धोक्याची तीव्रता समोर आली आहे. विशेष म्हणजे या मार्गावरून नियमितपणे स्कूल बसेसची ये-जा सुरू असते. मोठ्या आकाराच्या




स्कूल बसला या अरुंद वळणावरून मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागते. अशावेळी बसचे चाक या खड्ड्यात गेल्यास बसचा तोल जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे स्कूल बसच्या दरवाजाजवळ उभे असलेले विद्यार्थी अचानक बसचा तोल गेल्यास धोकादायक पद्धतीने बाहेर फेकले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच संबंधित प्रशासनाने या सम स्येची गांभीर्याने दखल घेणे अत्यावश्यक आहे. या धोकादायक ठिकाणाबाबत संबंधित ठेकेदाराला अनेक वेळा सांगूनही अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. केवळ अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी तातडीने या ठिकाणी संरक्षक कठडे, बॅरिकेडिंग तसेच रस्त्याची आवश्यक दुरुस्ती करून हा भाग सुरक्षित करावा,अशी मागणी होत आहे.

हा कोपरा, मोठे गटार आणि त्यामुळं अरुंद झालेला रस्ता यामुळे वाहनचालकांना वळण घेताना मोठा घेर घ्यावा लागतो.

पारशी नववर्षानिमित्त राज्यपालांच्या शुभेच्छा



मुंबई, दि. १४ : राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी राज्यातील जनतेला पारशी नूतन वर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. नवरोझ हा नूतन वर्षाचा पहिला दिवस उत्तम विचार, उत्तम वाणी आणि उत्तम कृती या त्रिसूत्रीचे स्मरण देतो. या मंगल प्रसंगी राज्यातील जनतेला आणि विशेषतः पारशी बंधू – भगिनींना नवरोझ तसेच पारशी नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देतो. हे वर्ष सर्वांच्या जीवनात सुख, समाधान, उत्तम आरोग्य व संपन्नता घेऊन येवो, असे राज्यपालांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

मनपा कर्मचारी धीरज परदेशी मृत्यू प्रकरण

आणखी एकाला अटक

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

महापालिकेच्या विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचारी धीरज कचरूसिंग राजपूत-परदेशी यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी दाखल गुन्ह्यात आणखी एकाचा सहभाग पोलिसांच्या तपासात समोर आला आहे. मुख्य संशयित आरोपींना मदत केल्याच्या आरोपावरून इम्रान मुसा सय्यद (रा. सिव्हील कॉलनी, मुकुंदनगर) याला भिंगार कॅम्प पोलिसांनी गुरूवारी (१३ ऑगस्ट) अटक केली. न्यायालयाने त्याला १७ ऑगस्टपर्यंत चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

धीरज राजपूत-परदेशी हे मुकुंदनगर परिसरातील दर्गा दायरा येथे पथदिव्यांच्या दुरूस्तीचे काम करीत असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच ९ ऑगस्ट रोजी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर शहरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

या प्रकरणातील मुख्य संशयित मुस्तकीम ख्वाजामिया सय्यद, मेहराज इब्राहिम सय्यद आणि सिराज इब्राहिम सय्यद (तिघेही रा. आलमगीर, भिंगार) यांना पोलिसांनी हैदराबाद येथून ताब्यात घेतले होते. त्यांना पळून जाण्यास मदत केल्याच्या आरोपावरून ख्वाजामिया उर्फ अकरम याकुब सय्यद (रा. आलमगीर) आणि वसीम रहिम सय्यद (रा. फकीरवाडा, मुकुंदनगर) यांनाही नगरमधून अटक करण्यात आली. याशिवाय महापालिकेचा वायरमन युनूस खान यालाही पोलिसांनी अटक केली आहे. या सर्वांकडे सध्या पोलिसांकडून कसून चौकशी सुरू आहे.

तपासादरम्यान मुख्य संशयित तिघांना इम्रान सय्यद याने मदत केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. मुख्य संशयितांना त्याने नेमकी कोणत्या स्वरूपाची मदत केली, हत्येच्या घटनेशी त्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध आहे का, तसेच घटनेनंतर आरोपींना लपण्यासाठी अथवा पळून जाण्यासाठी त्याने कोणती मदत केली, याचा तपास पोलीस

'हर घर तिरंगा' अभियानाच्या निमित्ताने विधान परिषद सभापती राम शिंदे यांच्या सहभागाने जामखेडमध्ये देशभक्तीचा उत्साह

जामखेड (समर्थ गांवकरी)



स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या रॅलीमुळे जामखेडमध्ये देशभक्तीमय वातावरण झाले निर्माण 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी जामखेड ग्रामीण व शहर मंडलाच्या वतीने आयोजित 'तिरंगा दौड रॅली' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी ४०० फूट लांबीचा भव्य तिरंगा हातात घेऊन नागरिकांनी एकजुटीने आणि शिस्तबद्धपणे रॅलीत सहभाग नोंदवला.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या रॅलीमुळे जामखेडमध्ये देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले.

राष्ट्रध्वजाचा सन्मान, देशासाठी अभिमान आणि राष्ट्रभक्तीची भावना जनमानसात अधिक दृढ करणारा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला.

या रॅलीमध्ये ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, मुख्य अधिकारी अजय साळवे, त्रिदल आज माजी सैनिक संघाचे अध्यक्ष सेवानिवृत्ती कॅप्टन लक्ष्मण भोरे, गटविकास अधिकारी शुभम जाधव, जामखेड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात, गटनेते तात्याराम पोकळे, बांधकाम समिती सभापती मोहन पवार, प्रवीण होळकर, नगरसेवक हर्षद काळे, प्रवीण चोरडिया, नंदा होळकर, श्रीराम डोके, सीमा कुलकर्णी, अमित चिंतामणी, प्रा, विकी घायतडक, विजय कुलकर्णी, राम पवार आदी मान्यवरांसह शासकीय अधिकारी, नगरसेवक-नगरसेविका, तिन्ही दलांतील आजी-माजी सैनिक, पोलीस अधिकारी, भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच NCC प्रशिक्षणार्थी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

संजीवनी अकॅडमीला राष्ट्रीय मॉडेल युनायटेड नेशन्स परीषदेत उपविजेते पद

संजीवनीच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

ग्वाल्हेर (मध्य प्रदेश) येथील मिटी युनिव्हर्सिटीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित 'मॉडेल युनायटेड नेशन्स (एमयुएन) राष्ट्रीय परिषद २०२६' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत संजीवनी अकॅडम ीच्या १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत उल्लेखनीय कामगिरी केली. विद्यार्थ्यांनी प्रभावी वक्तृत्व, आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे सखोल आकलन, राजनैतिक कौशल्य आणि विचार मांडणीच्या माध्यमातून संजीवनी अकॅडमीचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचविले.

मिटी युनिव्हर्सिटीने आयोजित केलेल्या 'मॉडेल युनायटेड नेशन्स' ही दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील परीशद नुकतीच पार पडली. देशभरातील नामांकित शाळा व महाविद्यालयांमधील सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेतील 'महाभारत' संकल्पनेवर आधारित स्पर्धेत जान्हवी अनुप पटेल, विहान समाधान दहिकर, कार्तिक चंद्रशेखर चांदगुडे, आरोही अमोल कुलकर्णी आणि प्रियांशु प्रवीण हिरे हिने 'संयुक्त राष्ट्र महिला स्थिती आयोग' (युएनसीएसडब्ल्यु) आधारित संकल्पनेवर प्रभावी विचार मांडल्याने विशेष प्रावीण्याने गौरविण्यात आले.तसेच 'महाभारत' संकल्पनेवर आधारित स्पर्धेत वीरा योगेश कोठारी, पलक विनायक बोधक, देवाशिष रावसाहेब शेंडगे , ओवी विकास आघाव, अथर्व अश्विनकुमार टिळेकर आणि श्रीहर्ष किसन थेटे यांनी सहभाग नोंदविला. युएनसीएसडब्ल्यु संकल्पनेवर आधारित स्पर्धेत राजवी रश्मी शर्मा, शर्विल योगेश खैरनार, सुरभी संतोषकुमार कोकणे, सई धनंजय कुंभार, गार्गी योगेश शूल, श्रेयसी निलेश गायकवाड आणि संविदा अमोल जोशी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. संजीवनी अकॅडमीच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत त्यातूनच संजीवनीचे विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करीत आहेत.

या यशाबद्दल संजीवनीचे अध्यक्ष श्री. नितीनदादा कोल्हे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट श्री. अमित कोल्हे यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचे कौतुक केले. यावेळी डॉ. आर. एस. शेंगडे, डॉ. सुधांशु भट, सुधा सुब्रमण्यम, अनुश्रीता सिंग, आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या राष्ट्रीय स्तरावरील काम गिरीबद्दल संजीवनी अकॅडमीच्या शिक्षक, पालक आणि विद्यार्थीवर्गातून अभिनंदन होत आहे.



संजीवनी अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील मॉडेल युनायटेड नेशन्स स्पर्धेत केलेली उल्लेखनीय कामगिरी ही संपूर्ण संजीवनी परिवारासाठी अभिम ानाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी केवळ प्रभावी वक्तृत्वच केले नाही, तर आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे सखोल आकलन, चिकित्सक विचार, नेतृत्वगुण आणि राजनैतिक कौशल्य यांचेही उत्कृष्ट प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांना पाठ्यापुस्तकाबाहेरील ज्ञान, जागतिक घडामोडींची जाणीव आणि आत्मविश्वासाने आपले विचार मांडण्याची संधी मिळावी, हा संजीवनी अकॅडमीचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. राष्ट्रीय स्तरावर संजीवनीचे नाव उंचावणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. भविष्यातही त्यांनी मोठी स्वप्ने पाहून देशासाठी सक्षम, जबाबदार आणि संवेदनशील नेतृत्व घडवावे, हीच अपेक्षा आहे.- डॉ. मनाली कोल्हे, संचालिका, संजीवनी अकॅडमी